# माणूस

साप्ताहिक

२५ मार्च १९६७ चाळीस पैसे




" निवडणुकीपासून आपण धडा घेतला पाहिजे आणि लोकांची गाऱ्हाणी तातडीने दूर करण्यासाठी परिणामकारक उपाययोजनाकेली पाहिजे. " — कामराज




दुसऱ्या क्रमांकाचे स्थान !

पण १४ कॅरेटचे समाधान !





## एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : अडतीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७४५१



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.


## पत्र-मैत्री

स. न. मार्च ११

दि. ११ मार्चच्या 'माणूस' च्या अंकात 'मुक्ताफळे' या सदरात 'सात विडे व निजाम' यांचा संबंध दाखविला आहे. त्याबाबत आणखी एक वेगळी माहिती सांगण्यात येते तीही मनोरंजक आहे.

निजाम उल्मुल्क असफजाह 'अव्वल' एकदा नमाज पढण्यास जात असता वाटेत त्याना एक भुकेला फकीर भेटला. असफजहानी त्याला पाहून जवळच्या सगळ्या रोटचा त्याला दिल्या. आनंदित होऊन त्याने निजामाला आशीर्वाद दिला, " तू जितक्या रोटचा दिल्यास तितके तुझे वंशज राज्य करतील. " नंतर मोजता रोटचांची संख्या सात निघाली. आजचे निजाम 'असफजाह सुव्वम' म्हणजे सातवे होते.

वरील घटना आमच्या लहानपणी संस्थानी शिक्षण खात्याने पुरस्कृत केलेल्या उर्दू पुस्तकात दिली असल्याने जास्त खरी मानावी. मात्र ही माहिती विद्यार्थ्यांना शिकवून प्रस्तुतचे निजाम शेवटचे आहेत या समजुतीचा आपण प्रसार करीत आहोत, हे मात्र त्या शिक्षण खात्याच्या डोक्यात शेवटपर्यंत आले नाही.

**सुधाकर डोईफोडे, नांदेड**

# मंत्रिमंडळ

**दिल्ली दरबार**

श्रीमती इंदिरा गांधी यांची प्रधानमंत्रिपदी अविरोध निवड झाल्यामुळे देशाच्या येत्या पाच वर्षांतील राजकीय वाटाघाटींची दिशा आखण्यात सध्या त्या गर्क झाल्या असून एक श्री. मोरारजी देसाई यांचा अपवाद सोडला तर इतर सर्व मंत्री निवडताना त्यांनी आपल्या नेतृत्वाला आव्हान मिळणार नाही याची पुरेशी दक्षता घेतली आहे. मंत्रिमंडळात कोणाकोणाचा समावेश करावयाचा, याबद्दल इंदिरा गांधी यांनी काँग्रेस अध्यक्ष श्री. कामराज यांचाही सल्ला घेतलेला नाही. गेल्या सोमवारी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाल्यानंतर पत्रप्रतिनिधींशी बोलताना आपला सल्ला घेतला नसल्याची गोष्ट कामराज यांनी मोठ्या खुबीने जाहीर केली. श्रीमती गांधी यांनी मंत्रिमंडळ बनविताना अध्यक्षांचाही सल्ला घेतला नाही, याबद्दल अनेक काँग्रेससदस्यांनी तीव्र नापसंती व्यक्त केली. विरोधीपक्षीय सदस्यांची प्रतिक्रिया तर अधिकच जहाल आहे.

मंत्रिमंडळाच्या बनावापेक्षा खरा प्रश्न आहे तो प्रधानमंत्री इंदिरा गांधी व उपप्रधानमंत्री श्री. मोरारजी देसाई यांचे जमणार कसे हाच ! संसदीय काँग्रेस पक्षाच्या नेतेपदाची निवडणूक लढविण्याची श्री. मोरारजी देसाई यांनी घोषणा केली त्या वेळी देशाला यापुढे कणखर नेतृत्वाची गरज असून तसे नेतृत्व आपणच देऊ शकतो, असे जाहीर केले होते. ही घोषणा करताना नव्याने निवडून आलेल्या पक्षसदस्यांपैकी अनेक जणांचा आपल्याला पाठिंबा मिळेल, अशी त्यांची कल्पना होती. म्हणून शुक्रवारी सकाळी नेतेपदाची निवडणूक लढविण्याची घोषणा करताच त्यांनी श्री. के. सी. पंत यांच्यामार्फत आपल्याला नेमका किती सदस्यांचा पाठिंबा

# की - मित्र मंडळ

मिळेल, याची चाचपणी करण्यास प्रारंभ केला; परंतु खुद्द आपला गुजरातदेखील एकमुखाने आपल्या पाठीशी नाही, हे ध्यानात आल्यानंतर निवडणूक लढवून राजकीय आत्महत्या करून घेण्याऐवजी आपल्या स्वभावाशी विसंगत असलेली तडतोड करण्याचा व्यापारी मार्ग त्यांनी स्वीकारण्याचे ठरविले. आपल्याला शंभरपेक्षा अधिक मते मिळणार नाहीत, याची के. सी. पंतांमार्फत खात्री झाल्यानंतर निवडणूक लढविण्यास आपण तयार नसल्याचे श्री. देसाई यांनी कामराजांना कळविले. नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी जोरदार थप्पड दिल्यामुळे आधीच हतबल झालेल्या काँग्रेस पक्षातील अंतर्गत दुहीचे आणखी एकदा दुबळे प्रदर्शन व्हावयास नको म्हणून नेतेपदासाठी निवडणूक टाळण्याच्या खटपटीत असलेल्या कामराजांना देसाई यांच्या तडजोडीच्या वृत्तीमुळे बरेच हायसे वाटले. त्या उलट आपल्याला मागील निवडणुकीपेक्षाही या वेळेला श्री. देसाई यांच्यापेक्षा अधिक मते मिळणार याची खात्री असलेल्या इंदिरा गांधी यांना निवडणूक होऊन आपल्याला नेतृत्वावर उघडउघड शिक्कामोर्तब व्हावे असे वाटत होते.

## गृहखात्याचा हट्ट सोडला

मोरारजी देसाई हेही तडजोडीला तयार झाले त्यामागे त्यांचाही स्वतःचा हिशेब आहे. आता निवडणूक लढवून पराभूत झालो तर आपल्याला मंत्रिमंडळाचे दरवाजे कायमचे बंद होतील, हे त्यांनी जाणले. त्याऐवजी आता मंत्रिमंडळात दुय्यम स्थान स्वीकारून प्रवेश करावा व या ना त्या कारणाने इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वास हादरा बसताच प्रधानमंत्रिपद आयते आपल्याकडे येण्याचा संभव आहे हे

ओळखून निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्याची त्यांनी तयारी दर्शविली ! मात्र या माघारीचे बक्षीस म्हणून सरदार पटेल यांच्या निधनानंतर रद्द करण्यात आलेले उपप्रधानमंत्रिपद आपल्याला मिळाले पाहिजे, अशी त्यांनी अट घातली. श्री. देसाई मागे एकदा क्रमांक दोनसाठी रुसले होते व त्यामुळे त्यांची बस त्या वेळी चुकली होती. यामुळे आता केवळ क्रमांक दोनवर त्यांचे समाधान होण्यासारखे नव्हते. इतर मंत्र्यांपेक्षा आपल्याला निश्चित स्वरूपाचा वरचा दर्जा मिळावयास पाहिजे व उपप्रधानमंत्रिपद असा हुद्दा निर्माण केल्यानेच तो दर्जा मिळेल अशी त्यांनी अट घातली. उपप्रधानमंत्रिपद निर्माण करण्यास इंदिरा गांधी यांचा विरोध होता. परंतु कसेही करून निवडणूक टाळण्यासाठी उत्सुक असलेल्या कामराजांनी इंदिरा गांधी यांच्यावर दडपण आणून श्री. मोरारजी देसाई यांना उपप्रधानमंत्रिपद देण्याबाबत त्यांना राजी केले ! परंतु तरीही श्री. देसाई यांचे समाधान झाले नाही. त्यांना स्वतःकडे गृहखातेही हवे होते; परंतु सर्वच दृष्टींनी अतिशय महत्त्वाचे असलेले हे खाते आपल्या विश्वासातील श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याकडून काढून घेऊन ते मोरारजींकडे सोपविण्यास इंदिरा गांधी मुळीच तयार नव्हत्या. यामुळे शुक्रवारी रात्री पुन्हा एकदा वातावरण तंग झाले. ' उपप्रधानमंत्रिपद व गृहखाते ' ही मोरारजी देसाई यांची मागणी तर '-उपप्रधानमंत्रिपद व गृहखात्याशिवाय कोणतेही खाते ' अशी इंदिरा गांधी यांची ' ऑफर ' अशी परिस्थिती निर्माण झाली. आपण यापेक्षा अधिक कोणतीही सवलत देऊ शकत नाही, हे इंदिरा गांधी यांनी कामराजांमार्फत निःसंदिग्ध शब्दांत कळविल्यानंतर मोरारजी देसाई आणखी एक पाऊल मागे सरकले व गृहखात्यावरचा आपला दावा त्यांनी सोडून दिला. एवढे सर्व झाल्यानंतर रविवारची प्रधानमंत्र्याची निवड हा केवळ औपचारिक विधी उरला होता.

तो आटोपताच इंदिरा गांधी यांनी आपले सहकारी निश्चित करण्यास प्रारंभ केला. या बाबतीत अधिक वेळ घालविण्याची त्यांची तयारी नव्हती. कारण जस-जसा वेळ जाईल तसतशी दडपणे वाढतील व आपल्या मनाजोगते सहकारी आपल्याला निवडता येणार नाहीत हे त्यांना माहीत होते. श्री. मोरारजी देसाई यांच्याकडे अर्थखाते देण्याचे ठरवल्यानंतर त्या खात्याचा राज्यमंत्री त्यांनी निवडावा असे इंदिरा गांधी यांनी सुचविले. हे सुचविण्यामागेही दोन उद्देश होते. आपल्याला अर्थखात्याचा राज्यमंत्री निवडण्याचे श्री. देसाई यांना स्वातंत्र्य दिल्यानंतर इतर खात्यांबाबत त्यांचा सल्ला घेण्याची जरुरी राहिली नाही. शिवाय अर्थखात्याच्या यापुढील यशापयशाला एकटे मोरारजी देसाई यांना जबाबदार धरता यावे, या-दृष्टीने त्यांच्या खात्यात आपण हस्तक्षेप केला नाही हेही या स्वातंत्र्यामुळे सिद्ध करता येत होते. श्री. के. सी. पंत यांनी गेल्या दोन-चार दिवसांत आपल्याकरिता जे परिश्रम केले ते ध्यानात घेऊन श्री. मोरारजीभाईंनी त्यांना आपला सहकारी म्हणून निवडले.

## नवे मंत्रिमंडळ

मंत्रिमंडळाच्या निवडीबाबत श्री. देसाई यांचे जसे ऐकावयाचे नाही, त्याप्रमाणेच श्री. देसाई यांना उपप्रधानमंत्रिपद देण्यासाठी दडपण आणणाऱ्या कामराजांचेही ऐकावयाचे नाही, असे इंदिरा गांधी यांनी ठरविले. आपण स्वत: निर्णय करू शकतो, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी श्री. संजीव रेड्डी यांना वगळण्याचा धाडसी निर्णय केला. श्री. संजीव रेड्डी यांना वगळले जाणार आहे, याची कामराजांना मुळीच कल्पना नव्हती. त्याप्रमाणे डॉ. त्रिगुण सेन व करणसिंग ही काँग्रेस पक्षाबाहेरील माणसे निवडून त्यांनी कामराजांना आणखी एक धक्का दिला. संजीव रेड्डी यांच्या हकालपट्टीमुळे आणखी एक फायदा असा झाला की, मंत्रिमंडळामध्ये गेल्या वर्षभर उपद्रवकारी ठरलेल्या 'सिंडिकेट'चा शेवटचा अवशेषही निष्प्रभ ठरला. स. का. पाटील व अतुल्य घोष पराभूत झाल्यामुळे एकाकी उरलेल्या संजीव रेड्डींना वगळल्यामुळे मंत्रिमंडळातील 'सिंडिकेट'चे अस्तित्व नष्ट करणे इंदिराजींना अगत्याचे वाटले. श्री. अशोक मेहता नियोजनमंत्री म्हणून फारसे यशस्वी ठरलेले नसताना त्यांच्याकडे नियोजनाव्यतिरिक्त पेट्रोलियम व रासायनिक हे आणखी एक महत्त्वाचे खाते सोपविले आहे. अशोक मेहता यांची बढती ही इंदिरा गांधी यांनी पक्षांतर्गत विरोधकांच्या नाकावर टिच्चून केली आहे. चार वर्षांपूर्वी साधे उपमंत्री असलेल्या दिनेशसिंगांना आता कॅबिनेटमध्ये घेण्यात आले असून त्यांच्याकडे व्यापारासारखे महत्त्वाचे खाते सोपविले आहे. वैयक्तिक जिव्हाळ्याचे संबंध याशिवाय बढतीमागे कोणतेच कारण नाही, अशी मल्लीनाथी खुद्द काँग्रेस पक्षातील सदस्य करीत आहेत. के. के. शहा यांच्या नेमणुकीबद्दलही काँग्रेस पक्षात संताप व्यक्त करण्यात येत आहे. श्री. शहा यांचा लौकिक ज्यांना माहीत आहे त्यांना या नेमणुकीमुळे इंदिरा गांधी यांनी काय साधले असा प्रश्न पडला आहे.

कोणीतरी असे म्हटले आहे की इंदिरा गांधी निर्णय चटकन् करतात, परंतु तो निर्णय बरोबर आहे की चुकीचा आहे, हे मात्र त्यांना कळत नाही. आपले सहकारी व सल्लागार निवडताना हे वर्णन बरोबर आहे हेच श्रीमती गांधी यांनी सिद्ध केले आहे. गेल्या वर्षीच्या मंत्रिमंडळात सुब्रह्मण्यम्, अशोक मेहता व दिनेशसिंग या तिघांना इंदिराबाईंचे 'किचन कॅबिनेट' म्हटले जात असे. या वेळेस त्या आणखी एक पाऊल पुढे गेलेल्या आहेत. एक मोरारजी देसाई व त्यांचे अर्थखाते सोडले तर सारेच मंत्रिमंडळ 'किचन कॅबिनेट' झाले आहे. श्री. मोरारजी देसाई यांच्याशी मंत्रिमंडळांतर्गत झुंज घेण्यासाठी हे 'किचन कॅबिनेट' उपयोगी पडणार असले तरी देशापुढील असंख्य महान समस्या सोडविण्यासाठी ते कसे समर्थ ठरणार हाच खरा प्रश्न आहे. देशातील राजकीय विचारवंत नव्या मंत्रिमंडळाबाबत व्यथित झाले आहेत ते या काळजीपायीच.

●

**सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळे

## □ एक होता कावळा !

एक होती चिमणी. एक होता कावळा. चिमणीचं घर होतं मेणाचं. घर कसलं चांगली चाळ होती ! घर मेणाचं आणि आत राहणारी चिमणीही मेणाची. चिकटायला पक्की. एकदा चिकटली की सुटायची नाही. वितळायला सोपी. चिमणीच्या घरात राहायला मिळाले म्हणून सगळे चाळकरी म्हणत, " चिमणुलीबाई, तू किती थोर, किती कर्तृत्ववान्, किती सुंदर, किती मनमिळाऊ, किती मनमोकळी ! " चिमणी मनात म्हणे, " माझं घर मेणाचं आहे म्हणून सगळी असं म्हणता, हे मी ओळखते. माझं घर शेणाचं असतं त्या कावळ्यासारखं, तर इकडे फिरकला नसतात."

हो, सांगायचं राहिलंच. कावळ्याचं घर होतं शेणाचं. कावळ्याने राजहंसाची पिसे पळवून आणली होती. अधूनमधून ती पिसे खोवून तो दिमाखात वावरे. लोक म्हणत, " हा तर कावळा आहे. उगाच राजहंसाची पिसे लावून फिरतो. " कावळा धूर्त होता. त्याने सांगितले, " माझी पिसे उसनी असली तरी ती मी टाकणार नाही. मी टाकली की ती उचलून तुम्ही लावाल हे मला माहीत आहे. "

पुढं काय झालं ? पावसाळा आला. नक्षत्र बदललं. कामराज नक्षत्रावर मोठ्ठा पाऊस पडला. कावळ्याचं घर गेलं वाहून. उसनी पिसे उडून गेली. कावळा थंडीवाऱ्यात कुडकुडू लागला. अधूनमधून ओरडे, " काव ऽ काव ऽ "

मेणाचं घर वाहून गेलं नाही. नक्षत्र जरी कसलंही असलं, कितीही पाऊस पडला तरी चिमणीचं घर कधी वाहून जाणं शक्य नसतं.

मग चिमणीच्या घरापाशी कावळा आला. दार बंद होते. कावळा म्हणाला, " चिमणुलीबाई, चिमणुलीबाई, तुझ्या घरात येऊ ? "

चिमणीने आवाज ओळखला. शेणाचे घर वाहून गेले आहे, हे चतुर चिमणीने ओळखले. चिमणी कामात होती. एका मुलाची आंघोळ झाली होती. तान्हे मांडीवर होते. तिचे हे फार फार लाडके. कधी रडायचे नाही. सदा हसतमुख. लहान असले तरी शहाणे होते. चिमणी म्हणाली, " कावळेदादा, जरा थांबा. "

कावळा सारखा दार ठोठावीत होता. हाका मारीत होता. चिमणी म्हणाली, " दादा, तुम्ही सीनियर असून असे काय करता ? पायावर तान्हे आहे. त्याला न्हाऊमाखू घालते. मग दार उघडते. "

दाराबाहेर गलका वाढत होता. चाळकरी जमले होते. कावळ्याला चिमणी घरात घेते की नाही, हे त्यांना पाहायचे होते. कावळा मनात म्हणाला, " माझ्याहून हे सर्व क्षुद्र आहेत. लाचार आहेत. "

वराच वेळ झाला तरी चिमणी दार उघडेना. कावळ्याने भोवती जमलेल्यांना सांगितले, " इकडे सहज आलो होतो. चिमणुलीबाई अडचणीत आहेत असे कळले. म्हटलं भेटून जावं. " मध्येच तो हाका मारी, " चिमणुलीबाई, दार उघड. "

चिमणुलीबाई म्हणाली, " न्हाऊ-माखू घालून झालं. स्वयंपाकपाणी करून झालं की दार उघडते. "

वराच वेळ दाराशी ताटकळत ठेवल्यावर मग चिमणीने दार उघडले. कावळा आत आला. तो काकडतच होता. आत शिरताच म्हणाला,

" मी चुलीजवळ बसणार ! " चिमणी घाबरली. घोरणाने म्हणाली, " तिथे सगळा स्वयंपाक आहे. चुलीवर खिचडी आहे. अडमडशील, लवंडशील. बसायचे तर दारापाशी बैस. "

बाहेर जमलेले बघे फिदीफिदी हसले. कावळा म्हणाला, " मी कुडकुडतो आहे म्हणून चुलीशी बसतो म्हटले. नपेक्षा बाहेरच जातो. " जमलेल्या लोकांचे हसणे थांबले. सगळ्यांची सहानुभूती कावळ्याकडे गेली. त्यांचे चेहरे पाहून चिमणीही वरमली. विचार करून म्हणाली, " चुलीजवळ बैस बापडा. पण कशात चोच घालू नकोस, या अटीवर तेथे बैस. "

कावळा चुलीजवळ बसला. तेथूनच म्हणाला, " मुलं झोपली, जेवणं झाली की तू बाहेर गेल्यावर मी घर सांभाळीन. " चिमणी म्हणाली, " मी बाहेर गेले तर तू अवश्य घर सांभाळ. "

थोड्या वेळाने चिमणी घराबाहेर पडली. तिला चार घरं हिंडणं भागच होतं. चोची पैदा झाल्या होत्या. चारा आणणं भागच होतं !

चिमणी बाहेर पडताच, चुलीवरच्या खिचडीने कावळा अस्वस्थ झाला. तो वास त्याला स्वस्थ बसू देईना. त्याने चोचीने ढवळले. सगळी वाफ त्याच्या शेपटीवर आली. चिमणीची पोरे जागी झाली. बघतात तो कावळ्याची शेपूट भाजलेली पोरं ओरडली, " चिमणुलीबाईची खिचडी खाल्ली. शेपूट भाजली हाय हाय. "

कावळा पोरांकडे बघून हसला. त्याने चिमणीचे घर सोडले नाही. मेणाच्या घरात बसून कावळ्याने हळू हळू पोरांना संथा द्यायला सुरुवात केली.

चिमणी–कावळ्याची स्पर्धा टळली. यनॅनिमिटी झाली. जग स्तिमित झाले.

काही दिवसांनी चिमणीच्या घरातून चिमणीची पोरे ओरडू लागली, " काऽव, काऽव, काऽव..." चिमणीची पोरं एकेक रत्नं होती. प्रति शिवाजी, प्रति कोसिजीन, प्रति जॉन्सन, प्रति लेनिन, प्रति माओ, प्रति गांधी, प्रति नेहरू, प्रति मेनन, अशी एक एक पराक्रमी. प्रति काव काव करणे त्यांना सहज़ जमू लागले. युनॅनिमिटी झिंदाबाद !

## □ स्वेटलाना आणि झारकॉव

दि. १० किंवा ११ मार्च असेल. रात्रीची वेळ होती. असेल साडेनऊ–दहाची. चाळींतून, वाड्यांतून, घराघरांत अंथरुणाचे नकाशे तयार झाले होते. आम्हीही

अंथरुणावर अंग टाकण्याच्या विचारात होतो. तेवढ्यात दारावर थाप पडली. या वेळी कोण ? असा विचार करीत आम्ही दार उघडले. तो काय ? दारात एक मध्यम वयाची, चांगली उंचनिच, गौरवर्णी-बरीचशी तांबूसच अशी एक परदेशीय महिला उभी. आम्हांला घाम फुटला. ती बाई म्हणाली, " मी स्वेटलाना. मला आश्रय हवा आहे. "

बापरे ! तरीच आम्हांला घाम फुटला बरं का. स्वेटलानाच ती !

खोलीत येऊन खुर्चीवर बसल्यावर आम्ही नम्रपणे विचारल, "आपण स्वेटलाना हे कळले. पण आपण कुणाच्या कोण ?"

" मी स्टॅलिनची कन्या. माझे वडील रशियाचे पंतप्रधान होते." रशियाच्या पंतप्रधानाच्या मुलीला भारतात माझ्यासारख्या साध्या माणसाकडे आश्रय मागण्याची वेळ का यावी, हे काही कळेना. आमच्या देशात पंतप्रधानांची मुलगी पंतप्रधान होते. अशी देशोघडीला लागत नाही, मी हे म्हणताच स्वेटलाना म्हणाली,

" रशियात राहणे मला अशक्य झाले. जगात फक्त भारताची पंतप्रधान एक स्त्री आहे. तिला माझी दया येईल म्हणून मोठ्या आशेने मी भारतात आले. शिवाय एका भारतीय माणसाशी मी लग्न केले असल्यामुळे मी भारताची सून आहे. तुमच्या देशातले राजे शत्रूच्या सुनांनाही मोठ्या इतमामानं पूर्वी वागवत असत म्हणे; परंतु माझी निराशा झाली. काही दिवस तरी मी तुमच्याकडे लपून राहू शकेन का ?"

स्वेटलाना म्हणजे श्रमदेवता. अशा या स्टॅलिनकन्येला आमच्यासारखा आळशी माणूस थारा देऊ शकत नाही, हे आम्ही तिला नम्रपणे सांगितले. कोसिजीनचे भारतावरील उपकार आम्ही विसरू शकत नाही, असा खणखणीत इशारा आम्ही तिला दिला. स्वेटलानाचा बाप पोलादी पुरुष असेल; पण कोसिजीनने तर भारतात पोलादी कारखानेच सुरू केले आहेत. आम्ही कोसिजीनशी कृतघ्न होऊ शकत नाही, असे बजावताच स्वेटलाना ताडकन् उठली. आल्या पावली ती निघून गेली.

दिल्लीमध्ये नेतानिवडीची गडबड सुरू असताना, मागल्या वेळेस, शास्त्री गेल्याने कोसिजीनला दहा दिवस राहावे लागले; परंतु या वेळेसही उपसंरक्षणमंत्री झारकॉव्ह इथे का, असा प्रश्न आम्हांला पडला होता. हे कोडे एकदम सुटले. स्वेटलानाला शोधण्यासाठी झारकॉव्ह आलेले होते. संरक्षणमंत्री मार्शल मॅलिनोव्हस्की कॅन्सरने आजारी आहेत म्हणून, नाहीतर तेच आले असते. झारकॉव्हने तिला खूप शोधली, पण स्वेटलाना त्यांना सापडली नाही ! कारण, भारताचे ह्यात लोहपुरुष राममनोहर लोहिया यांच्या उत्तर प्रदेशात ती लपली होती. परंतु झारकॉव्ह जाताना सांगून गेले होते, "स्वेटलानाला भारतात ठेवलेत तर तुमचे आमचे जमायचे नाही."

छे, छे. स्वेटलानाला आम्ही आश्रय देऊ, असा संशय तरी झारकॉव्हला कसा आला ? स्टॅलिन गादीवर असताना ती आली असती तर इंदिराजींनी ताजमहाल

तिला स्वतः दाखवला असता. पण स्टॅलिन गेल्यावर, बेरियाला गोळ्या घातल्यावर क्रुश्चेव्हची उचलबांगडी झाल्यावर इतक्या वर्षांनी या स्टॅलिनकन्येला, कोसिजीनचा रोष पत्करून इथ आश्रय देण्याची कल्पनाही भारत सरकार करू शकत नाही. इंदिराजींनी तिला सांगितले, " जले जाव ".

स्वेटलाना आता स्वित्झरलँडला निघून गेली आहे. आपण तिला आश्रय दिला नाही ही शरमेची व दुःखाची गोष्ट आहे, असे ब्रह्मचारी लोहियांना वाटते आहे. स्वेटलाना येथे राहावी, असे लोहियांना खुशाल वाटो, इंदिराजींनी केले ते बरोबर केले. एका देशात दोन पंतप्रधानकन्या कशाला ? तिबेटचे लामा आहेत तेवढे पुरेत !

## □ गांधी विचार दर्शन :

महाराष्ट्राच्या नव्या मंत्रिमंडळात बॅ. गुंडू पाटील यांना वगळण्यात आले. त्यांना मंत्री न केल्यामुळे त्यांनी उपमंत्री होण्यासही नकार दिला, असे त्यांनी मुलाखतीत सांगितले. दुसरे एक पाटील दोन वर्षांपूर्वी उपमंत्रिपदावरून मंत्रिपदावर गेले, तेव्हाच ते राजीनामा देणार होते. परंतु महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती पाहून त्यांनी त्या वेळेस ते केले नाही. या वेळी मात्र त्यांचा नाइलाज झाला.

' गांधी विचार दर्शन ' या ग्रंथाच्या बाराव्या खंडात महात्मा गांधी सांगतात,

" मंत्रिपदे ही सेवेची प्रवेशद्वारे आहेत. आणि सेवा बजावण्यास ज्यांना सांगण्यात येईल त्यांनी आनंदाने आपली शक्ती जास्तीत जास्त खर्च करून बजावायची आहे. म्हणून या पदांकरता झोंबाझोंबी होणे बरे नव्हे. "

मंत्रिपदे ही सेवेची प्रवेशद्वारे असली तर उपमंत्रिपदे ह्या खिडक्या असाव्यात. या खिडक्यांत बसून प्रथम चाललेली सर्कस पाहावी लागते; अर्थात् खिडकीत किती वेळ अवघडून बसायचे हा प्रश्न बॅ. गुंडू पाटील यांना पडला असावा व अखेर त्यांनी खिडकी सोडली. खिडक्यांबद्दल गांधीजींनी काहीही सांगितले नाही.

आपल्याला खिडकीतूनच का खाली उतरावे लागले, याचा विचार बॅ. पाटील यांनी सुरू केला असलाच पाहिजे. मंत्री म्हणजे सेवेच्या प्रवेशद्वारातून आत गेलेला— कसा असावा हे म. गांधी पुढे सांगतात,

" मंत्र्याचे खाजगी जीवन इतके साधे असावे की त्याची लोकांच्या मनावर छाप बसावी. कोणाचाही वशिला कोठेही चालता कामा नये. मंत्र्यांना व्यसने तर कोठल्याही प्रकारची असू नयेत. "

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात जे मंत्री झाले त्यांचे हे वर्णन आहे. बॅ. गुंडू पाटील यांनी नंतर जे पत्रक काढले आहे, त्यात ते म्हणतात की, काँग्रेसचा एक सच्चा पाईक म्हणून मी यापुढे काम करणार आहे. नाईक नाहीतर पाईक. तळमळीच्या माणसांना स्वस्थ राहणे शक्य नसते. —ग्यानबा

●

क्षमीर

# विचार वारे

## □ पाश्चिमात्त्य वृद्धांचे एकाकी जीवन

पश्चिमेच्या व्यक्तिवादी समाजात वृद्धावस्थेमुळे अक्षम बनलेल्या नागरिकांचे जीवन कसे एकाकी व उदास होत चालले आहे याची थोडीशी कल्पना एक ब्रिटिश तज्ज्ञ प्रा. क्रू यांनी थोड्या दिवसांपूर्वी दिल्लीच्या भेटीत दिली. ब्रिटनमध्ये तेथले सरकार वृद्ध नागरिकांची सर्वतोपरी काळजी घेत असूनही तेथल्या वृद्धांच्या मनात 'आपण आता समाजाला नको आहोत' अशा भावनेने घर केले आहे. आधुनिक ब्रिटिश कुटुंबांत आजी–आजोबांना स्थान नसते, त्यामुळे त्यांचे नोकरीधंद्याचे जीवन संपले की त्यांना कुठल्यातरी धर्मादाय संस्थेने चालविलेल्या वृद्धाश्रमाचा आश्रय घेणे भाग पडते; याचा अर्थ सार्वजनिक आरोग्यात जी सुधारणा झाली आहे, तिचे सर्वच परिणाम चांगले आहेत असे म्हणता येणार नाही; कारण सार्वजनिक आरोग्य सुधारल्यामुळे वृद्धांची संख्या वाढत चालली आहे व त्यामधून सामाजिक व आर्थिक अशा दुहेरी समस्या निर्माण होत आहेत. ब्रिटनच्या हल्लीच्या पाच कोटी प्रौढ लोकसंख्येत ६५ लाख वृद्ध आहेत व त्यांच्यापुढची सर्वांत मोठी समस्या एकाकी-पणाची आहे. वैद्यकशास्त्र या समस्येचे उत्तर देऊ शकत नाही. माणूस मुळात वृद्ध का होतो या शास्त्रीय प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यासाठी सध्या संशोधन चालू आहे. ते यशस्वी होऊन उत्तर मिळाले तरी त्याचा परिणाम फक्त वृद्धांची संख्या वाढण्यात होईल ! कारण हल्ली इंग्लंडात सेवा-निवृत्तीचे वय ६५ वर्षांचे असले तरी प्रत्यक्ष शारीरिक क्षमतेशी त्याचा फारसा संबंध नाही व "बहुतेक लोक या वयात सेवानिवृत्त होतात ते केवळ सामाजिक रूढी पाळण्यासाठी होतात."

भारतात कौटुंबिक प्रेमभावनेचे बंधन सबळ असल्याने सध्या तरी ही समस्या जवळ जवळ नाहीच; कारण वृद्धांची काळजी सरकार नव्हे तर कुटुंब घेते. पण ही परिस्थिती किती दिवस टिकेल ? वाढत्या नागरीकरणाबरोबर जीवनमान वाढ-विण्याची मागणी वाढत जाणार, तरुण पिढी अधिकाधिक व्यवहारी होत जाणार आणि सुशिक्षित स्त्रिया कुटुंब-प्रमुखाचे वर्चस्व दूर सारण्याचे प्रयत्न करणार. एवढा चौफेर हल्ला कुटुंब-संस्थेला सहन होईल काय ?—तसे वाटत नाही.

## □ तिबेटचे भवितव्य

दि. ९ मार्च १९५९ या दिवशी स्वातंत्र्यप्रेमी तिबेटी जनतेने चिनी वकिलाच्या लष्करी झोटिंगशाहीविरुद्ध सशस्त्र लढा आरंभला. या ऐतिहासिक दिनाच्या आठव्या

वर्षदिनानिमित्त काढलेल्या एका पत्रकात दलाई लामांनी तिबटच्या सांप्रतच्या दुर्दशेवर प्रकाशाचा झोत टाकला आहे. सोळा वर्षांच्या चिनी वर्चस्वाच्या काळात तिबेटी जनतेचे अनन्वित हाल करण्यात आले आहेत. तिबेटची शतकानुशतके जतन केलेली संपत्ती तर लुटण्यात येत आहेच; पण तिबेटी जनतेवर चिनी भाषा जबरदस्तीने लादून व तिबेटी नावाचे चिनी नावांत रूपांतर करून एकूण सर्व तिबेटी जनतेचे 'हानीकरण' (हान समाजात रूपांतर) करण्याची मोहीम पद्धतशीरपणे चालू आहे. चीनमध्ये तथाकथित सांस्कृतिक क्रांती सुरू झाल्यापासून व लाल रक्षकांच्या गुंडगिरीला सरकारी प्रोत्साहन मिळाल्यापासून तर तिबेटी संस्कृतीची व बौद्धमनाची अधिकच क्रूरपणे पायमल्ली होत आहे. केवळ विहारांची नव्हे, तर घराघरांची झडती घेऊन तेथल्या मूर्तींचा व इतर धार्मिक वस्तूंचा विध्वंस करण्यात येत आहे.

परंतु निर्वासित तिबेटी जनतेने पुन: स्वतंत्र तिबेटला परतण्यासाठी आवश्यक ती तयारी करण्याचे कार्य अविरतपणे चालू ठेवले आहे. गौतम बुद्धाच्या शिकवणुकी-प्रमाणे न्याय, समता व लोकशाहीवर आधारलेली एक घटना तिबेटसाठी तयार करण्यात आली आहे व निर्वासित तिबेटी जनतेचे प्रतिनिधीही निवडण्यात आले आहेत. भारत सरकारने निर्वासित तिबेटी जनतेला खूपच सढळ साहाय्य केले आहे; परंतु इतक्या वर्षांत चीनच्या जुलमी राज्यकर्त्यांनी तिबेटी जनतेला मूलभूत स्वातंत्र्याचा लेशदेखील लाभू दिला नाही, हे लक्षात घेऊन भारताने आता तिबेटल अधिक सक्रीय पाठिंबा, राजकीय पाठिंबादेखील—देण्याची वेळ आली आहे.

आशिया खंडात टिकाऊ शांतता स्थापन व्हायची असेल तर भारत व चीन या दोन महान् देशांत शांतता असणे आवश्यक आहे; परंतु तिबेटला स्वातंत्र्य मिळून तो एक अ-लष्करी प्रदेश झाल्याखेरीज ही शांतता स्थापित होणे शक्य नाही. ●

## परदेशी चलन हवे ना ?

'अमेरिकन एक्स्प्रेस' या जागतिक कीर्तीच्या प्रवास-संस्थेचे उपाध्यक्ष फ्रँक एरिक्सन नुकतेच नव्या दिल्लीला आले होते, तेव्हा त्यांनी नावाला साजेल अशा निर्भीडपणे मांडलेले मत :

'सर्व जगात टूरिस्ट-वाहतूक धामधुमीने चालू आहे, तेव्हा हिंदुस्थानाने या परिस्थितीचा लाभ घेतला नाही तर परदेशी चलनाची चणचण असल्याची तक्रार करण्याचा भारताला फारसा अधिकार पोचत नाही. सध्या हिंदुस्थानात जेवढी टूरिस्ट-वाहतूक आहे त्यापेक्षा अधिक वाहतूक हिंदुस्थानाला हाताळता येणार नाही; पण अधिक हॉटेले, अधिक विमान-वाहतूक व प्रवासावर कमी बंधने अशा तिहेरी उपाययोजनेने तेथला टूरिस्ट-व्यवसाय कितीतरी पट वाढविता येईल.'

# २

# छे छे! एवढयाने कसे होणार!

भुकेचे एवढे लाचार आणि बीभत्स दर्शन आजच प्रथम झाले. भुकेमुळे झिजत चाललेली माणसे आज पाहिली. धुळीत पडलेल्या अन्नाच्या दाण्यासाठी वखवखून सारी माती उकरणारे मानव पाहिले. बियासकट कच्ची बोरे आणि इतर फळे खाल्ल्याने पोटे फुगलेली मुले पाहिली. अन्नाच्या घासासाठी आपापसांत भांडणारी म्हातारी माणसे पाहिली. चार-चार दिवस मुळीच न जेवलेली माणसे पाहिली. आणि एकवेळ तरी मूठभर धान्य मिळावे म्हणून भडभडून रडणाऱ्या बाया पाहिल्या.

दुष्काळ आणि भूक या जितक्या भयानक गोष्टी आहेत, तेवढयाच त्या नाटयहीन आहेत! भुकेने माणसे अतिशय गरीब, अबोल, लाचार बनतात. डोळे खोल गेलेले असतात. चामडीवर सुरकुत्या पडलेल्या असतात. चालण्या-बोलण्यात संथपणा आलेला असतो. कोरडी जीभ कोरडया ओठांवरून सारखी फिरवली जात असते. अशी एक-दोन माणसे पाहिली म्हणजे काही वाटत नाही! पण भुकेने झिजत चाललेल्या अशा लोकांचा जमावच्या जमाव पाहिला म्हणजे मात्र मन हादरून जाते.

बिहारात अति तीव्र दुष्काळ पडलेल्या भागांमध्ये पलामू जिल्हा आहे. पलामू जिल्ह्याचे मुख्य ठाणे डाल्टेनगंज पटन्यापासून सुमारे पावण दोनशे मैलांवर दक्षिणेला आहे. डाल्टेनगंजला जायला निघालो, तेव्हापासूनच दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या. डोळे अतिशय खोल गेलेला, अंगाची नुसती हाडं उरलेला एक खेडुत तरुण गाडीच्या डब्यात येऊन मला विचारू लागला, " बाबूजी, तुम्ही तुमच्या घरी मला नोकरी देऊ शकाल ?" बोलताना तो सारखा श्वास टाकत होता आणि जीभ ओठांवरून फिरवीत होता. पलामू जिल्ह्यातूनच तो आला होता. गावात काही काम मिळत नव्हतं आणि खायला काही उरलं नव्हतं. बऱ्याच दिवसांचा तो भुकेला दिसून येत होता. त्याला खाण्यासाठी म्हणून मी काही पैसे काढून दिले. शेजारचा प्रवासी म्हणाला, " उगाच पैसे दिलेत. आजकाल कुणीही दुष्काळाचं नाव सांगून भीक

'माणूस'

प्रतिनिधीकडून

# प्रागजीभाई सारखी मान हलवीत होते..

मागतो." पण मी बाहेर पाहिलं तेव्हा तो तरुण प्लॅटफॉर्मवरच कुठला तरी पदार्थ घेऊन अवाशीपणाने बकाबक खात होता. तो बरेच दिवसांचा उपाशी होता हे नक्की.

सुमारे तेरा लाख वस्तीच्या पलामू जिल्ह्यात असे आठ-दहा लाख लोक तरी भुकेने तडफडत आहेत. त्यांच्यापैकी मोजक्या लोकांना रिलीफ कमिटीतर्फे रोजी आठ-आठ औंस धान्य मिळते. ज्यांना मिळते त्यांचा श्वास तरी टिकून राहतो आहे. इतरांना लवकर मदत पोचली नाही तर लाखांच्या संख्येने ते हळूहळू भुकेपायी मृत्यूच्या तोंडी जाणार आहेत! विशेषतः, जे शारीरिक कष्टाची कामे करू शकत नाहीत असे वृद्ध स्त्री-पुरुष, मुले, गर्भवती स्त्रिया आणि गुरेढोरे यांना जगणे अतिशय जड जाणार आहे.

पलामू जिल्हा हा बिहारच्या नैर्ऋत्य टोकाकडील सीमेवरचा जिल्हा. छोटा नागपूरमधील बराचसा जंगली भाग या जिल्ह्यात येतो. बराचसा भाग खडकाळ, डोंगरी आणि अर्धा भाग जंगली आहे. जिल्ह्यातील केवळ २५ टक्के जमीन शेतीखाली आहे. जिल्ह्यातलं मुख्य पीक आहे भात आणि मका. भाग डोंगरी असल्याने जमिनीचे उत्पन्न विशेष नाही. बरा पाऊस झाला की शेतकऱ्याला एका एकरामागे दहा-बारा मण भात मिळतो. पाऊस साधारण वर्षाला ५० इंच पडतो; पण यंदा पाऊस पडलाच नाही आणि पिकंच निघाली नाहीत. जिल्ह्यात शोण आणि कोयल या दोन मोठ्या उत्तरवाहिनी नद्या आहेत. दरवर्षीच उन्हाळ्यात त्या आटतात. पण आटल्या तरी एखादी धार वाहत असते. थोडं खोदलं की पाणी मिळते. पण यंदा नद्यांमध्ये धारा तर नाहीच. पण नद्यांच्या पात्रातही खोल खणावे तेव्हाच पाणी मिळते. त्यामुळे साऱ्या जिल्ह्यातल्या विहिरी सुकून गेल्या आहेत. पाच-पाच मैलांच्या पंचक्रोशीत एखादीच खोल विहीर ओली आहे. रात्रभरात विहिरीत पाणी

साचते. आणि दिवसभरात पुन्हा ते संपून जाते.

## चैनपूरच्या केंद्रावर

सेन्ट्रल रिलीफ ट्रस्ट ऑफ बाँबेच्या जीपमध्ये बसून मी डाल्टेनगंजपासून चैनपूरला जायला निघालो. डाल्टेनगंजच्या पश्चिमेला चार-पाच मैलांवर चैनपूर आहे. डाल्टेनगंज सोडले आणि लगेच कोयल नदी लागली. नदी नव्हतीच, नदीचे एक फर्लांग रुंदीचे कोरडे ठणठणीत वाळवंट होते. वाळवंटात ठिकठिकाणी लोक पाण्याचे खड्डु खणताना दिसत होते.

धुळीचा रस्ता पार करून चैनपूरला पोचलो तेव्हा तिथल्या रिलीफ कमिटीच्या कचेरीपाशी ही गर्दी जमली होती. नागडी मलं, अर्धनग्न वृद्ध स्त्री-पुरुष हातांत कटोरे घेऊन कमिटीतर्फे चालविल्या जाणाऱ्या मुफ्त जेवणघरापाशी आपले अन्न घेण्यासाठी उभे होते. बाजरी, तांदूळ, बटाटे आणि मीठमिरची यांच्यापासून केलेली पातळ खिचडी प्रत्येकाला एकेक कटोरा देण्यात येत होती. आणि ती भुकेली माणसे शेजारीच बसून आधाशीपणे ती खिचडी खाऊन फस्त करीत होती. आपापल्या कटोऱ्यातील एकेक शीत चाटून पुसून घेत होती. अंबिका नावाचा एक म्हातारा पाच मैलांवरून चालत ती खिचडी खाण्यासाठी केंद्रावर आला होता. केंद्राच्या यादीत त्याचे नाव नव्हते. डोक्यावर हात ठेवून तो बसला होता. त्याला खिचडी मिळाली तेव्हा ती धड खाताही येईना. किती दिवस जेवला नाही म्हणून विचारले तर तो म्हणाला, " बहुत दिनसे खाया नहीं बाबू. " त्याचा तरुण मुलगा घर सोडून कुठल्या तरी कामावर निघून गेला होता. म्हाताऱ्याकडे कुणाचे लक्ष नव्हते. चैनपूरला खिचडी मिळते, असे कुठून तरी ऐकल्यावर धडपडत तो आला.

जयपूरचे केंद्र सौराष्ट्रातून आलेली काही मंडळी चालवितात. सौराष्ट्रातून, मुंबईतून आणि मुंबईच्या उपनगरांतून सेन्ट्रल रिलीफ ट्रस्टने जमा केलेली वर्गणी या केंद्रासाठी वापरली जाते. केंद्रातर्फे चैनपूर, नवाडी आणि आणखी एका ठिकाणी अशी तीन मोफत भोजनगृहे चालविली जातात.

चैनपूरच्या भोजनगृहावर मी गेलो तेव्हा चैनपूर केंद्राच्या चालकांपैकी एक श्री. प्रागजी देसाई यांची एकच धावपळ चालली होती. तिथल्या भोजनगृहाचे काम आटोपून त्यांना पुढे नवाडीला जायचे होते. नवाडीच्या केंद्रावर ते गेल्याशिवाय कोरड्या खिचडीचे वाटप होणार नव्हते आणि वाटप झाल्याशिवाय नवाडीतील चुली पेटणार नव्हत्या. आताच बारा वाजून गेले होते. आणि नवाडी चैनपूरपासून दहा मैलांवर होते.

घाईघाईने प्रागजींनी आपली कामे आटोपली आणि ते निघाले. मीही त्यांच्या जीपमध्ये उडी टाकली. दहा मैलांचा ठार वाळून काळचा पिवळचा पडलेल्या जंगलातून गेलेला धुळीचा नागमोडी रस्ता. ठिकठिकाणी रस्त्यावर लांब-लांबून पाण्याच्या पखाली आपापल्या गावी नेणारे ओढलेल्या चेहऱ्यांचे स्त्री-पुरुष, मधूनच

वाळलेली शेते, एक वाळलेले तळे अधिक खोल करण्याचे दुष्काळी काम चालू होते. त्याकडे एक दृष्टी टाकून ड्रायव्हर म्हणाला, "सगळ्या भागात बारा महिने कमळं फुलविणारं हे एकच तळं होतं. तेही सुकलं बिचारं या वेळी!"

शेवटी नवाडीला जीप पोचली तेव्हा दीड वाजून गेला होता. सुमारे हजार एक वृद्ध बाया-माणसं, मुळं केंद्रावर उन्हात ताटकळत उभी होती. नवाडीच्या पंचक्रोशीतून ती पाच-पाच मैलांवरून मूठ मठ खिचडीसाठी कशीबशी पायी चालत आली होती. धान्य घेण्यासाठी कुणा-कुणाजवळ टोपल्याही नव्हत्या. अंगावरच्या चामडीच्या सुरकुत्या झालेल्या. रिलीफ सेंटर देते एवढाच त्यांचा रोजचा आहार. त्यापलीकडे त्यांना काहीच खायला मिळत नाही. चैनपूरहून प्रागजी येऊन नवाडीची धान्याची कोठी उघडतात आणि त्यांना धान्य देतात तेव्हा कुठे त्यांना खायला मिळते. तोपर्यंत ते चोवीस तासाचे उपाशी. म्हणूनच प्रागजीभाईंची घाई चालली होती. लोक उपाशी असतील, लवकर पोचलं पाहिजे, असे ते सारखे जीपमध्ये घोकत होते.

जीप पोचताच प्रागजींनी ताबडतोब कोठी उघडली. दोन पोती खिचडीची आणि दोन बटाट्याची बाहेर काढली. रिलीफ कमिटीने दिलेल्या कार्डावर खिचडी, बटाटे आणि मल्टीव्हिटॅमिनच्या गोळ्या यांचे वाटप सुरू झाले. अंगावरच्या फाटक्या कपड्यांमध्येच हे धान्य ती माणसे घेत होती. काही काही स्त्रियांच्या साड्या त्यांची लाज झाकायलाही अपुऱ्या पडत होत्या. पुण्यातल्या भिकाऱ्यांची परिस्थिती यांच्यापेक्षा बरी असं वाटत होतं.

"बाबूजी यांना भिकारी समजू नका तुम्ही." गावातला एक प्रमुख गृहस्थ गंगा साह मला सांगत होता. "या वर्षी पाऊस झाला नाही म्हणून. नाहीतर यांच्यापैकी तुम्हांला कुणीही इथे दिसलं नसतं. यांच्यापैकी बहुतेकांच्या घरी थोड्या-थोड्या तरी जमिनी आहेत. या वेळी सगळी शेतं कशी तुम्हांला रबीच्या पिकांनी हिरवी हिरवीगार दिसली असती. ही सारी मुलं-बाया या वेळी पिकांची राखण करीत पक्ष्यांना हाकीत बसली असती, पण या वर्षी पाऊस झालाच नाही बाबूजी; इस साल बरखा आयाही नहीं."

## असा अकाल पाहिला नाही

गंगा साह सांगत होता ते खरं होतं. या वर्षी चैनपूर क्षेत्रात पावसाने कुठेच तोंड दाखविले नाही. पावसाची वाट पाहत लोकांनी आपल्याजवळ असतील नसतील ते धान्याचे दाणे पेरले. दाण्यांनी जीवच धरला नाही. आणि आता लोकांजवळ खायला दाणा उरला नाही. ज्यांच्या घरची माणसं जवळपासच्या खाणींमध्ये किंवा जंगलांमध्ये नोकरी करतात त्यांच्या दिवसभराच्या दीड रुपया मजुरीवर कुटुंब पोसलं जात नाही. ज्यांच्या घरी कुणी काम करणार नाही त्यांना रिलीफ सेंटरने खायला दिले नाही तर मरण्याची पाळी आहे. पुढच्या सप्टेंबरपर्यंत म्हणजे नवे पीक निघेपर्यंत नवाडीच्या पंचकोशीच्या लोकांना असेच मोफत रेशन मिळाले तर

कुणी मरणार नाही, असे गंगा साहू सांगत होता खरा; पण माझा त्याच्यावर विश्वास नाही. अपुऱ्या आहारामुळे अगोदरच लोकांच्या शरीरावर वाईट परिणाम होत आहे. चामडी सुकून जात आहे. हालचाली हळू होत आहेत. मुलांची पोटे फुगत आहेत.

खुद्द नवाडीची लोकसंख्या आहे २५० ची. पण आजूबाजूच्या पंचक्रोशीतील खेडी नवाडीमध्येच येतात. पंचक्रोशीमध्ये चार-पाच विहिरी आहेत. सर्व सुकलेल्या. फक्त गंगा साहूच्या विहिरीला पाणी आहे. दूरदुरून पाणी नण्यासाठी लोक येतात. रात्रीपर्यंत पाणी संपून जाते. सकाळी पुन्हा भरून येते. विहिरीजवळच्या सांडणी-मधील पाणी पिण्यासाठी आजूबाजूला सतत गुरे जमलेली असतात. वाडीतील गाई-बैलांची संख्या साडेपाचशेच्या जवळपास आहे. लोक सांगतात. गुरांचा चारा पंधरा दिवस पुरेल, नंतर गुरं तडफडून मरतील. गंगा साहू आणि त्याचा भाऊ जम्ना साहू या दोघांची मिळून ३५ बिघे जमीन आहे. जमिनीत दाणाही पिकला नाही. चारा निघाला तो आता संपत आला आहे. आणखी पंधरा दिवस पुरेल. गंगा साहू म्हणतो, त्याच्या घरचं धान्य त्याच्या कुटुंबाला आणखी तीन-चार महिने पुरेल. त्यानंतर त्यालाही मोफत धान्य घ्यावे लागेल; नाहीतर उपास काढावे लागतील. "आमच्या इलाख्यातून आम्ही मका बाहेर पाठवत होतो बाबूजी. पण असा दुष्काळ कुणी पाहिलाच नाही. माझी सारी उमर गेली, पण असा अकाल मी पाहिला नाही." लखनसिंह नावाचा एक म्हातारा शेतमजूर सांगत होता. भूमिहीन शेतमजूर आणि त्यातही म्हातारा. मुफ्त खिचडीशिवाय त्याला दुसरा सहारा नव्हता. आजूबाजूच्या जंगलात मोहाची झाडं पुष्कळ आहेत. मोहाची फळं अशा वेळी खायला उपयोगी पडतात. पण यंदा मोहही फुलला नाही. मोह आला असता तर आमच्या-वर ही पाळी आलीच नसती, असे कितीतरी लोक सांगतात.

गावचा मुखिया कुठे आहे म्हणून मी चौकशी केली, तेव्हा कळलं की, मुखिया जेलमध्ये आहे. मुखिया आणि त्याचा साथीदार यांनी रेशनचे धान्य देताना घोटाळे केले, गडबड केली म्हणून त्यांना म्हणे तुरुंगात टाकलं होतं.

दुष्काळाने मरत असलेल्या लोकांचे रेशन दाबण्याच्या, मधल्या मध्ये ते गडप कर-ण्याच्या, जास्त भाव लावून वाटण्याच्या किंवा मुळीच न वाटण्याच्या कितीतरी गोष्टी बिहारमध्ये ऐकू येताहेत. लोक अन्नान्न करून मरण्याच्या सीमेवर आले असताना असा भ्रष्टाचार करून स्वतःची पोळी पिकविण्यास लोक धजावतात तरी कसे याचे आश्चर्य वाटते! मुख्य म्हणजे असे प्रकार सरकारी अधिकाऱ्यांकडूनच घडतात. बिहारचे शासन भ्रष्टाचाराच्या बाबतीत कोणत्या थराला पोचले होते हे यावरून उघड होते. म्हणूनच जनतेच्या मनात काँग्रेस शासनाविषयी नाराजी होती आणि म्हणूनच निवडणुकीमध्ये काँग्रेसचा पराभव झाला. चँग-कै-शेकच्या चीनमध्ये जेव्हा दुष्काळ पडत तेव्हाही तिथले सरकारी अधिकारी असाच अमानुष स्वार्थीपणा दाखवीत.

ती चिनी भ्रष्टाचाराची वर्णने वाचली की संताप येत असे. आता असाच भ्रष्टाचार इथे खुद्द डोळ्यांनी पाहायला मिळतो आहे. विश्वास बसणार नाही अशा गोष्टी ऐकू येताहेत. पलामू जिल्ह्यातूनच नव्हे तर सर्वच ठिकाणांहून !

## लाचलुचपत भ्रष्टाचार

सरकारने कच्च्या विहिरी खोदणे, तलाव खोदणे, रस्ते बांधणे, कालवे दुरुस्त करणे अशा तऱ्हेची दुष्काळी काम सुरू केली आहेत. या कामांच्या मजुरीचा दर सरकारने ठरवून दिलेला आहे. हजार घनफूट माती खोदण्यासाठी सरकारने शंभर रुपये ठरवून दिलेले असतात. हे काम स्वतः सरकार न करता बऱ्याच ठिकाणी खाजगी ठेकेदार करतात. सरकार ठेकेदाराला हे मजुरीचे पैसे आणि वर त्याचेही कमिशन देते; पण ठेकेदार ज्या मजुरांकडून ही कामे करवून घेतो त्यांना मात्र पूर्ण शंभर रुपये कधीच देत नाही. १०० रुपयांपैकी ६०–७० रुपयेच मजुरांत वाटले जातात. बाकी ठेकेदार गडप करतो. बऱ्याच ठिकाणी अशा तक्रारी आहेत की या कामावर देख-रेख करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांचा या पैशामध्ये मोठा भाग असतो.

रब्बी पीक पेरण्यापूर्वी सरकारने पिकांसाठी कर्जे दिली. तसेच पेरण्यासाठी मोफत बी-बियाणेही वाटले; पण याचा फायदा सर्वांनाच मिळाला नाही. ज्यांचे राजकीय वजन जास्त अशांना या सर्व योजनांचे फायदे मिळाले. मी ज्या ज्या ठिकाणी हिंडलो त्या त्या खेड्यांमध्ये आणि खुद्द पटना शहरामध्येही मला एक अफवा फार जोरात ऐकू आली. काँग्रेस उमेदवारांनी आपापल्या मतदारसंघात आपल्या मतदारांना मुद्दाम पक्षपात करून फुकट बियाणे वाटले. खेड्यांतील लोक तर शपथेवर सांगतात. नावे सांगायला मात्र घाबरतात. बिहारचे राजकारण कसे आहे, हे श्री. मधू लिमये यांच्यावर जो हल्ला झाला त्यावरून सर्वांना कळेल.

सरकारी मदतकार्यामध्ये किती पक्षपातीपणा होतो आणि किती भ्रष्टाचार होतो, याचे आणखी एक ढळढळीत उदाहरण म्हणजे विहिरींच्या बोअरिंगची कामे आणि पंपिंग सेट्‌स्‌चे वाटप. ज्यांना खरोखरच गरज आहे अशांना याचे फायदे न मिळता ज्यांचे सरकारदरबारी वजन आहे किंवा जे अधिकाऱ्यांना पसे देऊ शकतात त्यांनाच मिळतात हे होय ! दुष्काळ निवारणासाठी सरकारने विहिरी खोल करण्याचे जे काम हाती घेतले आहे, ते करवून घेण्यासाठी अनेक सरकारी अधिकाऱ्यांचे हात ओले करावे लागतात !—असेच लोक हा सारा मलिदा लुटतात. खरे दुष्काळी लोक बाजूलाच राहतात. एकाच श्रीमंत कुटुंबाने सरकारच्या या योजनेमार्फत चार पंपिंग सेट्‌सू मिळवल्याचे उदाहरण माझ्या दृष्टोत्पत्तीला आले आहे. आणि दुष्काळ निवारण्यासाठी दिलेल्या या पंपांवर हे लोक धंदा करतात. ज्यांना शक्य आहे त्यांना पंप वापरण्यासाठी भाड्याने दिले जातात.

आणखी एका गावातील मुखियाने मुफ्त जेवणासाठी गावातील लोकांची यादी केली. अशा जेवणघरामध्ये मुले, वृद्ध स्त्री-पुरुष, गर्भवती स्त्रिया अशांनाच जेवण

मिळावे, असा संकेत आहे. पण या मुखियाने आपल्या जातीची मजुरी करू शकणारी बायामाणसेही या यादीत टाकली. खालच्या जातीतील गर्भवती स्त्रियाही वगळण्यात आल्या. अशा कितीतरी स्त्रियांना मी दगड उचलून फेकण्याची कामे करताना पाहिले आहे.

पलामू जिल्ह्यात ऐकलेल्या आणि पाहिलेल्या मी या भ्रष्टाचाराच्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या फारच मिळमिळीत आहेत. ज्यांना त्या वाचून संताप येत असेल त्यांनी तो आवरून धरावा; कारण पुढे गया जिल्ह्यात घडत असलेल्या याहूनही भयंकर आणि अमानुष भ्रष्टाचाराच्या कथा मी सांगणार आहे. त्या त्यांना वाचवणार नाहीत. नवाडी गावच्या मुखियाला अटक तरी झाली; पण असे कितीतरी मुखिये आणि सरकारी अधिकारी अजूनही मोकाटपणे चरत आहेत !

इकडे प्रागजीभाईंच्या खिचडीचे वाटप चालूच होते. गरीब, असहाय, म्हातारी, दुबळी मुले माणसे संथपणे येऊन लाकडी टोपलीत धान्य घेत होते. खिचडी मिळते आहे, असे ऐकून दूरदूरच्या गावची बायामाणसेही आशेने आली होती, रेशन वाटप संपल्यावर केंद्राची नवी कार्डस् करण्याचे काम सुरू झाले. दूर कोपऱ्यात साधारण कपडे केलेली वरच्या जातीतील विधवा बाई बसली होती. एकजण म्हणाला, " तिला द्या फ्री कार्ड. महाजन बाई आहे. विधवा आहे. मजुरी सोसत नाही. " केंद्रावरचे कुणी तरी म्हणाले, " अरे बाबा, ती तर पैसेवाली दिसते. हे लोक मरताहेत. " बाई रडू लागली.

आशाळभूत लोकांची चाचणी सुरू झाली. कैक दिवस न जेवलेले म्हातारेकोतारे होते. त्यांना कार्डस् मिळाली, केसरिया नावच्या म्हातारीचं कार्ड चोरीला गेलं होतं. कार्यकर्ते तरी काय करणार ? भलतेभलते लोक फायदा घेतात. त्यांच्याजवळ जेवढं धान्य येतं तेवढं जास्तीत जास्ती गरजू लोकांना वाटण्याचा ते प्रयत्न करतात.

एक म्हातारा वाटणारा हाती कुऱ्हाड असलेला अर्धनग्न खेडुत जवळ बसला होता. पूर्वी तो भलताच तगडा पहिलवान असला पाहिजे. पण आता साऱ्या शरीराची चामडी लोळत होती, चालताना भुकेमुळे तो थरथरत होता. बराच वेळ तो या नव्या कार्डवाटपाकडे आशेच्या नजरेने बघत होता. थोड्या वेळाने एकंदर रागरंग बघून कुऱ्हाडीवर भार टाकून तो उठला आणि खांद्यावर कुऱ्हाड टाकीत गंगा साहूला म्हणाला " सहुवा, जातोरे बाबा आता. कार्ड काही मिळणार नाही. आणि करतो जमेल तेवढी मजुरी. " साहू म्हणाला— " हां बाबा, जा आता. मी तरी काय करू ? खूप लोक उपाशी आहेत. "

## एवढ्यानं कसं होणार !

काम संपले आणि आम्ही जायला निघालो. एकाएकी शेजारी उभी असलेली दोन नागडी मुले धावत पुढे आली. जिथे धान्यवाटप चालू होते तेथील माती उकरून आपल्या कपड्यात घेऊ लागली. खाली फारच थोडे धान्य सांडले होते; पण तेव-

ढेही दाणे सांडलेले बघवत नव्हते. एकही दाणा वाया गेलेला त्यांना बघवत नव्हता. घरी जाऊन आता ती माती ते झाडतील आणि सापडलेले दाणे खाऊन टाकतील.

परत येताना प्रागजीभाई सारखी मान हलवीत होते. "छे: छे: एवढ्यानं कसं होणार! एवढ्यानं कसं होणार!"

चैनपूरला पोचलो तेव्हा रिलीफ सेंटरवर कपडे वाटपाचे काम चालू होते. सेंट्रल रिलीफ ट्रस्टची मंडळी घरोघर जाऊन चौकशी करून कुणाकुणाला खरोखरच कपड्यांची गरज आहे याची शहानिशा करीत होती. आणि कपड वाटीत होती.

थोडी माहिती घेण्यासाठी मी चैनपूरच्या प्रखंड अधिकाऱ्याच्या (ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर) कार्यालयात गेलो. समोरच एक नोटीस चिकटली होती–" शेतकऱ्यांना तकावी लोन देण्यासाठी सध्या पैसे नाहीत. त्यासाठी गर्दी करणे निष्फळ आहे. पंधरा–वीस दिवसांत या संबंधांत चौकशी करावी." आत बी. डी. ओ. साहेब एका रिलीफ अधिकाऱ्याची हजेरी घेत होते. रिलीफ अधिकारी त्याच्या केंद्रावर न राहता सतत डाल्टेनगंजलाच राहत होता म्हणून. कार्यालयात माहिती मिळाली की चैनपूर ब्लॉकमधील सर्वच्या सर्व म्हणजे सुमारे ७२ हजार लोकसंख्या दुष्काळग्रस्त आहे. ब्लॉकमध्ये तीनच मुफ्त भोजनगृहे आहेत.

पलामू जिल्ह्याची लोकसंख्या १३ लाख आहे. सबंध जिल्ह्यात सर्व संस्थांची मिळून एकूण ९५ मुफ्त भोजनगृहे चालतात. काही दिवसांत पलामू जिल्ह्यातच रणछोडदास स्वामींची सहायता संस्था २० हजार पीडितांना संपूर्ण मुफ्त भोजन पुरविणारी केंद्रे उघडणार आहे. त्यासाठी त्यांची तयारी चालू आहे. स्वयंसेवक येत आहेत. धान्याचे पीठ करण्याची, पोळ्या लाटण्याची, भाजण्याची यंत्रे येताहेत. मोठमोठे ट्रक्स येताहेत. त्यांचे सारेच काम मोठे आहे.

परंतु या सर्व केंद्रांमध्ये मिळून एकूण किती लोकांना जेवण मिळणार? जास्तीत जास्त सव्वालाख. उरलेल्या ११–१२ लाख लोकांचे काय होणार? सध्याच जिथे रिलीफ केंद्रांचे कार्यकर्ते पोचत नाहीत, तिथे काय परिस्थिती आहे? ज्या लोकांना हा जो अपुरा आहार मिळतो त्यावर ते जगू शकतील का? आठ महिने फुकट खाण्याची सवय झाल्यावर या लोकांमधली काम करण्याची, श्रम करण्याची ईर्ष्या कितपत उरेल? हे प्रश्न मला भेडसावीत होते. दुष्काळाच्या खऱ्या स्वरूपाची, त्याच्या परिणामांची अद्याप पूर्ण कल्पना आली नव्हती. वाहनांची सोय होत नव्हती त्यामुळे दूर जाऊन प्रत्यक्ष खात्री करता येत नव्हती.

पण लवकरच संधी मिळाली आणि या प्रश्नांची उत्तरे अक्राळ विक्राळ स्वरूपांत माझ्यासमोर उभी राहिली.

दरम्यान डाल्टनगंज येथे पलामू जिल्ह्याचे बिहार रिलीफ कमिटीचे मंत्री श्री. हरकचंद जैन तक्रार करीत होते, की पलामू जिल्ह्यातील बाथ या गावी कॅथॉलिक रिलीफ सोसायटीचे मदतीचे काम चालू आहे. आणि तेथून धर्मांतराचे प्रयत्न होत

असल्याच्या तक्रारी येत आहेत. ख्रिस्ती सोसायटीने काही कुटुंबांचे धर्मांतर केले की तेथील आर्यसमाज त्यांना पुन्हा शुद्ध करण्याचा प्रयत्न करतो. असे तेथे धर्मयुद्धच चालू आहे. या गोष्टीला साक्ष देणारे बरेच लोक डाल्टेनगंजमध्ये होते.

डाल्टेनगंजमधील व्यापाऱ्यांचे, वकिलांचे धंदे बसत चालले आहेत. पिकले काहीच नाही. लोकांच्या हाती पैसा नाही. कोर्टकचेऱ्या कोण लढवणार आणि नवनव्या वस्तूंची खरेदी कोण करणार ? या पेशातील लोकांची परिस्थिती सध्या मोठीच चमत्कारिक आहे. पूर्वी जे जमविले त्यावरच त्यांची गुजराण चालू आहे.

त्या दिवशी रात्री गयला जाण्यासाठी मी डाल्टेनगंज स्टेशनवर आलो तेव्हा आजूबाजूची गावं सोडून जात असलेल्या कंगाल लोकांची गर्दीच स्टेशनात जास्त होती. अर्धवट वस्त्रे अंगावर असलेली खंगलेल्या शरीराची बाया-माणसे धंदापाणी मिळविण्यासाठी वाट फुटेल तिकडे जात होती. त्यांच्यांत चर्चा चालू होती एकाच विषयावर सूखा-अकाल. लोक मरत असल्याच्या बातम्या होत्या.

मला घाई होती बोध गयेला जाण्याची. कारण तिथे अधिक तीव्र दुष्काळ पडला होता. तेथून येणाऱ्या बातम्या फारच भीषण होत्या. आणि तिथे वाहनांची सोय होणार होती.

आणि मी गया जिल्ह्यात लगेच गेलो, तेच बरे झाले. तिथे मी ज्या गोष्टी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिल्या, कानांनी ऐकल्या त्या विजेच्या धक्क्यासारख्या वाटत होत्या. तिखटमिठात बुडविलेल्या चाबकाचे फटकारे एकामागोमाग पाठीवर मारावेत, असे वाटत होते. गया जिल्ह्यात दोन-तीन दिवसांच्या भ्रमंतीत मी ज्या गोष्टी पाहिल्या त्या जन्मभर विसरणार नाही.

( अपूर्ण )

जानेवारी १९६८ अखेर, कविता-साहित्य स्वीकृत केले असल्यामुळे, साप्ताहिक 'माणूस'कडे येणाऱ्या यापुढील कवितांची दखल घेणे वेळेअभावी शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही साहित्यासोबत पुरेसे टपाल नसल्यास त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करता येणार नाही. कृपया या अडचणीची नोंद घेतली जावी. —सं.


ना खुणेचा बिल्ला...



ना कंटाळवाणा खोळंबा...




आमच्या सुसूत्र
'टेलर सिस्टिम' मुळे
तुमचा चेक ताबडतोब
वटवला जातो.



पंजाब नॅशनल बँक

स्वावलंबनाचा एकमेव मार्ग — उत्पादनवृद्धि

PR-PNB-6625/Mar/3



## शेकोटी

कोंदट सारी पडली हवा, भिजून गेली आहे धरा
पंख मिटून बसला आहे, मुलखावेगळा खटयाळ वारा
ढकळं भिजून, फुटून गेली, फुलून आली रान रोपटी,
अशा वेळी शकत बसावे, पेटवून छोटी एक शेकोटी.
अंगाला चटके बसतात, तरीहि दूर जाववत नाही
अशा वेळी तंद्री लागते, आठवतात जुन्या कविता काही
जुन्या गोष्टींची गर्दी होते, डोळे आपोआप मिटून येतात.
काय गवसले, काय हरवले, मन मांडते उगाच गणित
वेळकाळ काही कळत नाही, अभ्राच्छादित आकाश असते
एकटेपणाची आग अशी, जीवाला पुरती छळून घेते.

*—श्रीधर बा. देशपांडे*

## अशी असावी प्रीत

अशी असावी सर प्रीतीची
सरी – परी हस्ताच्या सुंदर
निथळुनि जावे त्यात परंतु
मी अन् माझे भोळे अंतर
अशी असावी प्रीत प्रखर तव
रवि–किरणांना जावी भेदून
अशी असावी प्रीती शीतल
चंद्रकरांचा व्हावा आठव
परी असावी प्रीत मुग्ध तव
अबोलीस वाटावे भूषण

*—सुधा सि. अष्टेकर*

## हुरहूर

अशा रंगाच्या ओंजळी
उधळू नकोस घाईने
अबोलीच्या कळीतून
कसे फुलेल चांदणे...
क्षितिजाच्या ओठावर
होते मावळतीचे गाणे
तुझ्या ओठावर अमृत
सांग कुणाचे हे देणे ...
स्वप्न सजवून गेले
असे निळाईचे सूर
तुझ्या विजेच्या स्पर्शाने
कशी पेरली हुरहूर ...

*—सौ. सुधा हेर्लेकर*

# आस्वाद :

गतकाळात रमायचे किंवा भविष्यकालात भटकायचे, हा सौंदर्यवादी मनालाछंद असतो, पण वर्तमान सोडून होणाऱ्या या प्रवासाला काही वातावरण अवश्य असते. 'शेकोटी'ने ते वातावरण उभे केले आहे. वारा बंद आहे आणि दिशा धुंद आहेत, अशा वेळी शेकोटी पेटवावी आणि बसावे असे कवीला वाटते. यातला विरोधाभास सुंदर आहे. शेकोटीने अंगच नव्हे तर मनही गरम केले आहे. शरीराला दूर जाववत नाही म्हणूनच की काय मनच दूर दूर धावू लागते आहे. हे वातावरण एक पाऊस पडून गेलेल्या गारठ्याचे दिसते, पण 'शेकोटी' ही शिशिर-ऋतूची सखी आहे, वर्षाची नाही हे खटकल्याखेरीज राहत नाही; मात्र गतायुष्याचा जमाखर्च एकलेपणाच्या आगीतच माणसाला सुचतो हे काही खोटे नाही. श्रीधर बा. देशपांडे यांच्या कवितेचे सूत्र पारदर्शक कल्पनांच्या मण्यात ओवल्यामुळे स्पष्ट दिसते.

'हुरहूर' ही पुष्कळदा नव्हे तर नेहमीच अनामिक असते. ती कधी एकाकी-पणाने वाटू लागेल, कधी मीलनातही वाटेल. सुधा हर्लेकर यांनी वर्णिलेली 'हुरहूर' विजेसारख्या स्पर्शाने पेरलेली आहे, यातल्या दुसऱ्या कडव्यातला मुग्ध प्रश्न फार समर्पक वाटतो, त्यात जितकी उत्कटता, तितकीच समज आहे. पण 'रंगाच्या ओंजळी' म्हणजे काय ? निळाईचे सूर हे आकाशाचे गाणे समजायचे काय ? अशी काही संदिग्धता बोचते. पण 'हुरहुरी'त सर्व स्पष्ट झाले तर ती हुरहूर कसली ? या दृष्टीने यातली संदिग्धता कवितेतल्या वातावरणाला पोषकच ठरते.

'अशी असावी प्रीत' याचे वर्णन देताना सुधा अष्टेकर यांनी काही प्रख्यात संकेत वापरले आहेत. हस्ताच्या सरींत वैपुल्य, भव्यता असते. आपणांला प्रतिसाद देणारे प्रेम असेच असावे असे कोणास वाटणार नाही ? चंद्र आणि सूर्य यांचे परस्परविरोधी गुण प्रत्ययाला यावेत, हीही उत्कट अपेक्षा असते. मुग्धतेच्या बाबतीत मात्र कवयित्री आग्रही दिसते. अबोलीला भूषण वाटावे इतके प्रेम मुग्ध असावे. पण हीच मुग्धता खरी बोलकी असते असा विरोधालंकार कवयित्रीला साधता नसता आला का !

—गोपीनाथ तळवलकर

पाय नेतील तिकडे जायचं असं ठरवून रात्री सतीश निघाला. नकळत त्याच्या पायांनी त्याला कृष्णीच्या बगीच्याशी आणून सोडलं. खरं म्हणजे सकाळीच त्याची पावलं तेथें रेंगाळत होती.

डाक बंगल्याच्या खिडकीतून सूर्याची कोवळी किरणं जेव्हा अंगावर पडू लागली तेव्हा सतीशला जाग आली. हवा कशी आल्हाददायक होती; अन् बंगल्याच्या आजूबाजूस पोफळी-फणसाची झाडं असल्यामुळं शांत वारा वाहत होता. मुंबईची दगदग, धावपळ, तेथील यांत्रिक जीवन येथे नव्हते. म्हणून कामानिमित्ताने

# माता

अनिल बळेल



चार दिवस का होईना ह्या नयनरम्य गोमंतकात आपण येऊ शकलो, ह्याचं सतीशला समाधान वाटलं.

सतीशला जाग आल्याचे लक्षात येताच डाक बंगल्याच्या नोकराने चहा आणून ठेवला आणि तो तेथेच उभा राहिला. नोकर ज्या अर्थी उभा आहे, त्या अर्थी त्याचे काही तरी काम असावे, हे सतीशने ओळखले. त्याने नोकराला विचारले, " काय काम आहे ? "

" बराच वेळ झाला कृष्णी आपली वाट पाहत आहे. "

" कृष्णी ! कोण कृष्णी ? " सतीश प्रथमच गोव्यात येत असल्याने येथे आपली वाट पाहणारी ही कृष्णी कोण बुवा, असा त्यास प्रश्न पडणे साहजिक होते. त्यावर नोकराने सांगितले, " इथली माळीण. "

" माळीण ? अन् मग तिचं माझ्याकडे काय काम आहे ? " सतीशने आश्चर्याने विचारले.

" तिनं फुलं आणली आहेत विकायला. म्हणजे काय, काल जे साहेब येथे होते त्यांनी तिला फुलं आणायला सांगितली होती; परंतु काल रात्री अचानक तार आल्याने ते निघून गेलेत अन् तुम्ही आलात ! तेव्हा कृष्णी म्हणते, आता फुलं आणलीच आहेत तर ह्या नवीन साहेबास पसंत पडली तर देऊन जाते. "

" अच्छा, अच्छा. पाठवून दे तिला आत. " सतीश म्हणाला.

माळीण म्हणजे एखादी वयस्कर स्त्री असावी, असे सतीशला वाटले; परंतु त्याचा अंदाज चुकला. कृष्णी चांगली वीस-बावीस वर्षांची रूपसंपन्न तरुणी होती. गव्हाळ रंग, तरतरीत नाक, टप्पोरे डोळे आणि बांधेसूद शरीराला साजेसेच मर्यादित उरोज, केसांचा गच्च अंबाडा बांधल्यामुळे चेहऱ्याला एक प्रकारचा तजेलाच आला होता. लुगडं गुडघ्यापर्यंत नेसलेलं असल्यामुळे निमुळत्या पोटऱ्या पाहाव्याशा वाटत होत्या. काही क्षण सतीश तिच्याकडे बघतच राहिला. तिच्या हातांत तऱ्हे-तऱ्हेची सुंदर फुले होती, परंतु फुलं आणि माळीण ह्यांपैकी अधिक सुंदर कोण, हे त्याला सांगणं कठीण होतं.

कृष्णी नमस्कार करून म्हणाली, " ही फुलं जेंच्या करता आणली होती, ते काल रात्रीच निघून गेल्याचं समजलं. आता तुम्ही घेऊ शकाल का ? ताजी सकाळीच तोडलेली फुलं आहेत. "

खरं म्हणजे सतीश फुलांचा शौकीन नव्हता; परंतु फुलांपेक्षा फुलांची माळीण आवडल्यामुळेच त्याने फुलं ठेवून घेतलीत !

त्यानंतर दोन दिवस कृष्णी बंगल्याकडे फिरकली नाही. त्या दोन दिवसांत सतीशने गोव्याचे सृष्टिसौंदर्य बघता येईल तेवढे बघून घेतले. पिवळी शेते–तांबडी माती–हिरवे माड अन् त्या हिरव्या वनश्रीत उठून दिसणारा शांतादुर्गेचा धवल कळस, रुपेरी जलधारांचे तांडव-नृत्य करणारा ' दूधसागर ', रोमांचकारी स्वातंत्र्य-

समराची आठवण करून देणारी पत्रादेवी, चारी बाजूंनी डोंगर अन् त्यांमध्ये हिरव्या रंगाचे वस्त्र परिधान केलेली कामाक्षी, आधुनिक जगाची साक्ष देणारी राजधानी पणजी, दुतर्फा पोफळीची, नारळाची, ताडा-माडाची, पपनस, अननसाची, फणस-काजूची झाडे आणि त्यांत वसलेली कौलारू बसकी घरं अन् त्यांवर डौलाने पसरलेले भाजीपाल्याचे वेल! मुंबईला कधी असे बघायला मिळते का? सतीशला वाटू लागले, त्या मांडवी नदीच्या किनारी तासन–तास जलात पाय बुडवून बसावे आणि बरोबर असावी कृष्णीसारखी युवती, नव्हे कृष्णीच!

तिसऱ्या दिवशी कृष्णी माळीण बंगल्यावरून जाताना सतीशला दिसली. त्याने तिला हाक मारली, "माळीण, ओ माळीण."

कृष्णी त्याच्याजवळ येत म्हणाली, "काय सरकार?"

"फुलं नाही आणलीस?"

"नाही. तुम्ही उद्या निघून जाल, माझी फुलं अशी दुसऱ्या दिवशी कोमेजत नाहीत, चार-चार दिवस टिकून राहतात."

"मग ही फुलं कोणाकरिता चालवली आहेस?"

"कोणाकरताही. जो हौसेने घेईल त्याच्याकरिता! नवरा युद्धावरून येइस्तोवर असेच फुलं विकून दिवस काढले पाहिजेत."

"नवरा? म्हणजे तुझे लग्न झाले आहे वाटते?"

"हो. सहा महिन्यांचा मुलगाही आहे."

सतीशने एक दीर्घ श्वास सोडला.

"साहेब, तुमच्या मुंबईला घेऊन चला मला." कृष्णी म्हणाली.

"मुंबईला? अन् तेथे येऊन काय करणार तू?"

"तुमच्या बायकोची सेवा करीन." कृष्णीने उत्तर दिले.

"पण माझी बायको असेल तर तू तिची सेवा करणार ना?"

"म्हणजे?"

"मी अजून लग्नच केले नाही." सतीशने खुलासा केला.

"आँ? अजून लग्नच केले नाही?" त्याचे वाक्य पुन्हा उच्चारून कृष्णी हसू लागली; "आमच्यात नाही इतके दिवस थांबत."

तिचा गोड चेहरा सारा दिवस सतीशला सतावीत होता. तिचे ते मधुर हास्य सारा दिवस त्याच्या कानात घुमत होते. संध्याकाळी फिरावयास जाताना, दुपारी काम करताना सारखा तिचाच चेहरा डोळ्यापुढे उभा राहत होता. रात्री झोपतानाही तिच्याबद्दलचेच विचार त्याच्या मनात थैमान घालत होते, आणि त्यामुळे त्याला बराच वेळ झोप आली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी डाक बंगल्याच्या नोकराला बरोबर घेऊन सतीश 'मंगेशी'च्या दर्शनास जाण्यास निघाला. जाता जाता त्याला फुलांचा एक छोटासा

सुंदर बगीच्या लागला.

" कोणाचा रे हा बगीचा ? " सतीशने विचारले.

" आपल्या कृष्णी माळिणीचा " नोकरान सांगितले, " ती राहतेही येथेच. "

" अॅं ! येथे तर आजूबाजूस कोणाची घरं दिसत नाहीत. तिला एकटीला भीती नाही वाटत ? "

" भीती अन् ती कशाची ? "

" एकटेपणाची, चोरीची. "

" छे, येथे चोरी करणार कोण ? अन् चोरायला आहे तरी काय ? "

सतीशच्या मनात आले की, त्याला सांगावे, विचारावे, ' कृष्णीचं मनोवेधक रूप ही काय कमी मौल्यवान ' चीज ' आहे का ?' पण त्याने विचारले नाही.

संध्यासमय संपवून जसजसा अंधकार सगळीकडे पसरू लागला तसतसा सतीश बेचैन होऊ लागला. पुस्तक वाचण्याचा, झोपण्याचा तो प्रयत्न करू लागला, पण व्यर्थ ! अखेर त्याने कपडे चढविले, टॉर्च घेतला आणि तो बाहेर पडला.

डाक बंगल्याच्या बाहेर पडल्यावर आपल्याकडे कोणी बघत नाही ना ह्याची त्याने खात्री करून घेतली. सर्वत्र शांतता पसरली होती. आकाश स्वच्छ होते आणि चांदणे पडले असल्यामुळे रस्ता नीट दिसत होता.

आपण कोठे चाललो आहोत ? का चाललो आहोत ? ह्याचा सतीशलाच पत्ता लागत नव्हता. ' पाय नेतील तिकडे जायचे ' असे तो म्हणत होता. आणि त्याच्या पायांनी त्याला कृष्णीच्या बगीच्याशी आणून सोडले. त्याची पावलं सकाळीच तेथे रेंगाळत होती, ती आता त्याला येथे घेऊन येणार नाहीत तर कुठे ?

बगीच्याच्या फाटकापाशी तो काही वेळ उभा राहिला. फाटक उघडण्यासाठी तो हात लावायचा अन् मागे घ्यायचा. त्याला भीती वाटत होती की, जर आत कुत्रा असेल तर तो आपण फाटक उघडताच ओरडेल अन् सगळी शांतता घालवून टाकेल. फाटक उघडताना त्या जीर्ण झालेल्या फाटकाचा आवाज होऊन आतील माणसास कोणीतरी आल्याची वर्दी लागेल, अशीही त्याला भीती वाटत होती. फाटकाला ज्या फळचा ठोकल्या होत्या त्यांतील दोन फळचांत थोडीशी फट होती, त्या फटीतून तो अखेर आत गेला.

जीवनात अशा प्रकारचा अनुभव सतीश प्रथमच घेत होता आणि जे काही होत होतं तेही अकल्पितपणेच ! जे होत होतं ते एका असाधारण उत्तेजनामुळे, एका विशिष्ट ओढीमुळे ! सतीशचे हृदय धडकत होते नाडीचे ठोके जलद पडत होते.

अशा अवस्थेत सतीश हळूहळू बगीच्यातील कृष्णीच्या घरापाशी आला. दरवाजा बंद होता, परंतु खिडकी उघडी होती. त्या खिडकीपाशी जे झाडं होतं त्याच्या गर्द छायेत उभे राहून सतीश आत पाहू लागला.

सतीशला दिसले की, त्याच्यापासून पाचच फुटांवर कृष्णी सूत कातत बसली

आहे आणि त्यात ती इतकी रममाण झाली आहे की आपल्या कपड्यांचीही तिला काळजी उरली नाही. तिचे काळेभोर केस पाठीवर विखुरले आहेत आणि कंदिलाच्या प्रकाशातही तिचा चेहरा चमकत आहे.

तन-मन विसरून बराच वेळ सतीश ते गोव्याच्या निसर्गसौंदर्याशी स्पर्धा करणारे मानवी सौंदर्य बघत राहिला होता. आणि हळूहळू त्याला एकप्रकारची धुंदी चढली, एकप्रकारची नशा चढली. त्या नशेत घराचा दरवाजा उघडून तो आत जाणार इतक्यात त्याला बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. पाळण्यात झोपलेल्या आपल्या बाळास शांत करण्याचा कृष्णी प्रयत्न करत होती; परंतु त्याचे रडणे काही थांबेना. अखेर तिने उठून बालकास घेतले आणि आपल्या छातीवरील संपूर्ण वस्त्र काढून टाकले. तरुण स्त्रीचा असा अर्धनग्न देह सतीश प्रथमच पाहत होता. नकळत त्याची पावले पुढे पडतात न् पडतात तोच कृष्णीने मुलाला छातीशी धरले आणि मुलगाही शांत होऊन स्तनपान करू लागला.

सतीशसारख्या संस्कारशील व्यक्तीस हे दृश्य अकल्पित होते. त्याची सद्सद्-विवेकबुद्धी जागी झाली आणि त्याने बघितले की, आता त्याच्यापुढे एक तरुण अनावृत स्त्री-शरीर नसून एका मातेचे शरीर आहे. माता–जिने सतीशला जन्म दिला. माता–जिने संपूर्ण मानव जातीला जन्म दिला आहे–ती माता !


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड

राजगड पुरंदर आग्रा

मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २



# आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू

उत्तरार्ध

लेखांक

बारावा

चीनमध्ये सर्वदूर आता निर्णायक युद्धाला सुरुवात झाली. आपल्याजवळ अमेरिकन शस्त्रबळ आहे. आता कम्युनिस्टांवर अखेरचा घाव घालावयास हरकत नाही, या विचाराने चँगने आपली सारी शक्ती आता या मोहिमेत ओतली. नानकिंगहून चँगने आज्ञा सोडली, आधी येनानवर हल्ला करून येनान ताब्यात घ्या. पुन्हा बाँबर विमाने येनानवर घिरट्या घालू लागली आणि लवकरच कोमिन्टांग सैन्याने येनानचा ताबाही घेतला. येनानमधील सरकारी कचेऱ्या कम्युनिस्टांनी आधीच हलविल्या होत्या. येनानचे महत्त्व त्यांच्या दृष्टीने आता संपुष्टात आले होते. माओ आणि चुह-तेह यांनी आपले सामान खेचरांवर बांधले आणि ते सरळ उत्तरेकडे निघाले. अशा भटकण्यात त्यांना आता नावीन्य नव्हते. लाल सैन्याची पवित्र्याची माघार चालू होती. चँगने मोठी मोहीम उघडलेली

पाहताच माओच्या आपल्या सेनापतींना आज्ञा गेल्या, " शत्रुसैन्य तुमच्यापेक्षा संख्येने मोठे असेल तर खुशाल माघार घ्या. शहरेदेखील शत्रूच्या ताब्यात गेली तरी हरकत नाही. पण जेव्हा आणि जिथे शत्रुसैन्य संख्येने तुमच्यापेक्षा कमी असेल तिथे शत्रूला घेरा, त्याचा नाश करा किंवा निःशस्त्र करून कैद करा. "

येनान सोडल्यावर चिनी कम्युनिस्ट पक्षाची मुख्य कचेरी उत्तरेला ग्रेट वॉलच्या दिशेने निघाली. बस्तान बसवायला योग्य स्थळ शोधीत कचेरी हिंडत होती. शेवटी उत्तर रेल्वेवरील शिचँग चुंग या छोटयाशा गावी राजधानी वसविण्यात आली आणि तेथून माओ लाल सैन्याची आणि सोव्हिएट कारभाराची सूत्रे हलवू लागला. दरम्यान लाल सैन्याच्या ताब्यात मांच्युरियातील जवळ जवळ सर्व ग्रामीण भाग आणि अनेक महत्त्वाची शहरे आली होती. शांटुंग प्रांतही जवळ जवळ सगळा कम्युनिस्टांच्या ताब्यात आला होता. आणि चीनमधील इतर बऱ्याच भागांतही कम्युनिस्ट शिरले होते. वाळूच्या किल्ल्याप्रमाणे ठिकठिकाणचे कोमिन्टांगचे बुरूज ढासळून पडू लागले होते आणि डिसेंबर १९४७ मध्ये माओ–त्से–तुंग आत्मविश्वासाने म्हणू शकत होता– " भाईनो, क्रांतीचा महान् क्षण आता जवळ येऊन ठेपला आहे. "

## ब्लड् ट्रान्स्फ्यूजन

खरोखरच क्रांतीचा क्षण जवळ येऊन ठेपला होता. पुराच्या लोंढ्याप्रमाणे निघालेल्या लाल सैन्याला आता कोणतीच शक्ती रोखू शकत नव्हती ! उत्तर शेन्सी भागातून आता लाल सैनिक विजयासाठी दाही दिशांना निघू लागले. एकामागून एक शहरे, प्रांत कम्युनिस्टांच्या ताब्यात येऊ लागले. चुह–तेह, पेंग–तेह–हुई, लिन पियाओ, चाऊ-एन-लाय् यांच्या आधिपत्याखालील लाल सेना आधीच गर्भगळीत झालेल्या कोमिन्टांग सेनांचा ठिकठिकाणी पाडाव करू लागल्या होत्या. वर्षभराच्या आत कम्युनिस्टांनी येनान परत मिळविले. युद्धातला मुख्य विनोद हा होता की, कम्युनिस्टांना लढण्यासाठी मिळणारी शस्त्रास्त्रे खुद्द त्यांच्या शत्रूकडूनच पुरविली जात होती. माओने एक आज्ञाच काढली होती,– "आपल्या शत्रूचे आणि साम्राज्यवादी देशांचे युद्धकारखाने यांवरच आपण आता आपल्या शस्त्रास्त्रांसाठी विसंबून राहावयास हवे. लंडन, वॉशिंटन आणि हानयांग यांच्या शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांतून बाहेर पडणाऱ्या मालावर आपला हक्क आहे. आणि ही शस्त्रास्त्रे आपल्याला शत्रूच आपल्या वाहनांमधून वाहून आणून देतील. हा विनोद नव्हे, हे सत्य आहे. "

आणि खरोखरच तशी वस्तुस्थिती होती. भ्रष्टाचार, अनैतिकता, पराभूत मनोवृत्ती यांमुळे कोमिन्टांग सैन्य खचत चालले आहे, असे अहवाल अमेरिकन प्रतिनिधी सतत पाठवीत असतानाही अमेरिकेकडून अब्जावधी डॉलर्सची शस्त्रास्त्रांची मदत चँगच्या हाती पडत होती. आणि चँगच्या भाडोत्री सैनिकांच्या

हातून ती लाल सैनिकांच्या हाती जात होती. अमेरिकेनेच चिनी कम्युनिस्टांना शस्त्रसज्ज केले. १९४५ ते १९४९ या काळात अमेरिकेने चँगला दोनशे कोटी डॉलर्सची मदत केली. आणि या मदतीपैकी पाऊण सामग्री कम्युनिस्टांच्या हाती आली ! या प्रतिष्ठेला माओ–त्से–तुंगने गंमतीने 'ब्लड ट्रान्सफ्यूजन' हे नाव ठेवले होते.

चँगचा पराभव आता अटळ दिसत होता, याला कारण केवळ कम्युनिस्टांची ताकद किंवा युद्धकौशल्य नव्हे, तर खुद्द कोमिन्टांग सैन्याची पराभूत, उदासीन मनोवृत्ती; चैतन्यहीनता; सैन्यातील आणि राजवटीतील भ्रष्टाचार व बजबजपुरी हीच कारण होती.

## कोमिन्टांगचा अधःपात

१९४५ सुमाराला चँग–कै–शेकने राष्ट्राला उद्देशून रेडिओवर एक भाषण केले. कोमिन्टांगविषयी बोलताना मोठ्या गर्वाने तो म्हणाला होता,– "कोमिन्टांग हा राष्ट्रीय क्रांती घडवून आणणारा ऐतिहासिक पक्ष आहे. मांच्यू राजघराण्याला कोमिन्टांगने सत्तेवरून ओढले. बादशाहीची स्वप्ने पाहणाऱ्या युआन–शिह–कै चा याच पक्षाने घुव्वा उडविला आणि त्याच्या लष्करी अनुयायांचा पराभव केला. राष्ट्रीय ऐक्य कोमिन्टांगनेच साधले. पाश्चात्त्यांनी चीनवर लादलेले अन्यायी करार मोडले. आठ वर्षे जपान्यांशी झुंज दिली. कोमिन्टांग म्हणजे स्वातंत्र्य आणि प्रगती यांचे प्रतीक."

रेडिओवरील भाषण ऐकणारे चिनी एकतर चँगच्या नावाने लाखोली तरी वाहत असतील किंवा गालातल्या गालांत हसत असतील ! आपण गाजविलेल्या पराक्रमाचा चँगने हा जो पाढा वाचला, त्यातली एखादीही गोष्ट जर पूर्णतया खरी असती तर कोमिन्टांग आणखी किती तरी वर्षे सत्तेवर टिकले असते. पण चँगने या सगळ्या जवळ जवळ थापा मारल्या होत्या. मांच्यू राजघराणे काय, किंवा युआन–शिह–कै काय, यांना उलथून पाडले ते लोकांच्या उत्स्फूर्त चळवळींनी. कोमिन्टांगने जपान्यांशी करार करू नये, यासाठी लाच म्हणून पाश्चात्त्यांनी चीनवर लादलेले जुने करार आपणहूनच रद्द केले होते. त्यात कोमिन्टांगने काही मर्दुमकी गाजविली नव्हती. आणि कोमिन्टांगने आठ वर्षे जपानशी झुंज देऊन त्याचा प्रतिकार केला हे विधान तर हास्यास्पद होते. डॉ. सन–यत्–सेनच्या नावामुळे सुरुवातीच्या काळात कोमिन्टांगला नैतिक प्रतिष्ठा होती, पण त्याच्यानंतर लवकरच तीही गेली. स्वातंत्र्य आणि प्रगती यांचे प्रतीक म्हणजे कोमिन्टांग, असे म्हणणे म्हणजे सत्याचा निव्वळ उपहास होता.

१९२४ साली कोमिन्टांग पक्षाचे पुनर्संघटन झाले आणि १९२७ साली पक्ष पूर्णपणे चँग-कै-शेकच्या ताब्यात गेला. तेव्हापासून उण्यापुऱ्या वीस वर्षांच्या काळात कोमिन्टांग पक्षाने देशाच्या प्रगतीकडे दुर्लक्षच केले. कोमिन्टांग म्हणजे भ्रष्टाचार,

कोमिन्टांग म्हणजे दडपशाही, कोमिन्टांग म्हणजे अन्याय, कोमिन्टांग म्हणजे आळस, अनैतिकता, प्रतिगामीपणा असे समीकरणच चीनमध्ये निर्माण झाले होते. आणि शेवटी शेवटी १९४८–४९ पर्यंत कोमिन्टांग राजवटीखालील शहरांमध्ये तर भ्रष्टाचाराचा, दारिद्र्याचा कळस झाला होता, आर्थिक व्यवस्था पार कोलमडून पडली होती आणि लोक आता कम्युनिस्ट केव्हा येतात, याचीच वाट पाहत होते.

## शांघायचे महापौर

जपानी आक्रमणाच्या वेळची शांघायमधील गोष्ट. शहराच्या सीमांवर चारी बाजूंनी जपानी हल्ले चढवीत होते. शहरात रोज मूकबळी पडत होते. अशा वेळी शांघायच्या महापौरांनी परदेशी वार्ताहरांना एक मोठी मेजवानी दिली. वेगवेगळ्या जनावरांच्या मांसांपासून केलेले तऱ्हेतऱ्हेचे चविष्ट पदार्थ मेजवानीत ठेवले होते. मद्याची रेलचेल होती. आग्रह करकरून खाणे झाल्यावर महापौर भाषणासाठी उभे राहिले. गंभीरपणे त्यांनी सांगितले, " शांघायवर जपानी आता अखेरची चढाई करीत आहे. शहर वाचणे शक्य नाही. पण आम्ही आमचा सन्मान वाचविणार आहोत. पळपुट्यांसारखे पळून जाण्यापेक्षा आम्ही मर्दपणे जपान्यांना तोंड देऊन स्वप्राणांची आहुती देणार आहोत. "

महापौरांनी नंतर दुसरे दिवशी सकाळी कोमिन्टांग सैन्याची एक शूर तुकडी मरेपर्यंत जपान्यांशी कशी लढणार आहे, हे त्यांना सांगितले. स्वतः महापौर या 'मृत्यूच्या तुकडीला' मार्गदर्शन करणार होते. या तुकडीच्या शौर्याच्या कथा सर्व जगाला कळाव्या म्हणून महापौरांनी सर्व वार्ताहरांना एका विवक्षित स्थळी जमून युद्धाचे निरीक्षण करण्याचे आमंत्रण दिले.

दुसरे दिवशी पहाटे उठून सर्व वार्ताहर मंडळी हे अपूर्व समरांगण पाहण्यासाठी जमली. बराच वेळ महापौर कुठे दिसेनात. शेवटी त्यांना कळले, कालची मेजवानी संपल्याबरोबर आपले सारे सामान गुंडाळून महापौर एका विमानाने शांघाय सोडून निघून गेले होते.

अशीच परिस्थिती सर्वच चिनी शहरांमध्ये होती. भ्रष्टाचार, खोटेपणा, बजबजपुरी सर्वत्र माजलेली होती. लोक कंटाळलेले होते.

सुमारे दहा वर्षांनंतर १९४९ सालापर्यंत परिस्थिती अधिकच चिघळली होती. १९४९ साली कम्युनिस्टांनी वेढलेल्या शांघाय शहरातील शासनव्यवस्था पार कोसळली होती. प्रतिकाराची शक्ती आणि इच्छा असलेली शासनयंत्रणा उरली नव्हती. एखादा प्रचंड किल्ला आतून पोखरल्यावर ढासळून पडावा, तसे झाले होते. शहराला कम्युनिस्ट वेढा देऊन बसले होते. आणि आर्थिक, सामाजिक, मानसिक आणि आरोग्याच्या दृष्टिकोनांतून शांघाय शहर परकोटीच्या खालच्या पातळीला पोचले होते. शांघाय हे चीनमधील अत्याधुनिक शहर; पण ते आता अत्यंत गलिच्छ झाले होते, आणि शहरातील लोकांची मानसिक अवस्था कमालीची ढासळली

होती. शांघायमधल्या आणि खरे पाहता साऱ्याच चीनमधील लोकांचा आता सर्वच गोष्टींवरील विश्वास उडाला होता. त्यांनी विचार करणेच सोडून दिले होते.

## कोसळलेली अर्थव्यवस्था

चलनवाढ एवढ्या प्रचंड प्रमाणावर झाली होती की, चँग-कै-शेकने नुकत्याच काढलेल्या युआनची किंमत पार रसातळाला गेली होती. एका अमेरिकन डॉलरला चार कोटी वीस लक्ष युआन मोजावे लागत होते. युआनला काही किंमतच उरली नाही. पोत्यांमधून नोटाच्या नोटा बांधून नेल्या तरी साधी भाजीदेखील मिळत नसे. रोज युआनची किंमत खाली खाली जात होती. पुढे पुढे तर एवढा गोंधळ माजला की, तासातासाला युआनची किंमत बदलू लागली. एकाच गावात ट्रॅमच्या तिकिटाची किंमत एका टोकाला वेगळी तर दुसऱ्या टोकाला आणखी बदललेली. दुसऱ्या टोकाला ट्रॅमचे भाडे किती असेल यावर ट्रॅममधले लोक चक्क जुगार खेळू लागले. काही दिवसांनी एका बाजूला चँग-कै-शेक चित्रचे असलेल्या या नोटा रस्त्याच्या कडेला आणि गटारांमध्ये, कचऱ्याच्या टोपलीत सापडू लागल्या. अर्थव्यवस्था पूर्णपणे कोसळली होती.

आणि या सर्व केविलवाण्या परिस्थितीत विनोद घडत होते. शांघाय शहराला वेढा घालून बसलेल्या कम्युनिस्ट सैन्याने शहराबाहेर जाण्याच्या दोन वाटा मुद्दाम सोडल्या होत्या. कोमिन्टांग सैन्याला पळून जाण्यासाठी. परंतु शांघायच्या संरक्षणासाठी ठेवण्यात आलेल्या सैन्याचा सेनापती हा पक्का बेरकी होता. तो असातसा पळून जाणारा नव्हता. त्याला सोने हवे होते. लढण्यासाठी नव्हे तर कम्युनिस्टांनी मोकळ्या सोडलेल्या वाटांनी आपल्या सैन्यासह यःपलायन करण्यासाठी ! परंतु दरम्यान तो सेनापती 'आम्ही लाल सैन्याशी जोरदार टक्कर देणार, रक्ताचा शेवटचा थेंब अंगात असेपर्यंत शांघायचे संरक्षण करणार ', अशा आरोळ्या ठोकत होता. शांघायमधल्या व्यापाऱ्यांकडून आणि धनाढ्यांकडून सोने उकळण्याची ही त्याची युक्ती होती. व्यापाऱ्यांना लढाई नको होती. लढाईत हा सेनापती हरणार हे त्यांना अगोदरच ठाऊक होते. अखेर सेनापतीने आपल्या सैन्यासह पळून जाण्यासाठी त्याला किती सोने द्यावे याविषयी शांघायच्या व्यापाऱ्यांमध्ये गुप्त बोलणी सुरू झाली !

शहरात कायद्याच्या नावाखाली पोलिस वाटेल तो अत्याचार करीत. कोणत्याही माणसाला पकडून त्याला कम्युनिस्ट हेर म्हणून रस्त्यात गोळ्या घालून ठार मारीत. चोरांच्या टोळ्याच्या टोळ्या शहरात दिवसाढवळ्या पोलिसांच्यादेखत चोऱ्या करीत होत्या आणि दरोडे घालीत होत्या.

## शहरावर चढाई

शेवटी कम्युनिस्टांच्या हाती शहर जाण्यापूर्वीचा प्रसंग तर अत्यंत विनोदी रीतीने साजरा करण्यात आला. कोमिन्टांग सैनिकांना शहराच्या आघाडीवर लाल सैनिकांच्या हस्ते चांगला मार बसतो आहे, हे सर्वांना ठाऊक होते; परंतु अधिकृत-

रीत्या असे जाहीर करण्यात आले की, कोमिन्टांग सैनिकांनी आघाडीवर नुकताच मोठा विजय मिळविला असून विजयी सैनिकांचे स्वागत करण्यासाठी 'विजय-दिन' साजरा करण्यात येणार आहे. या 'विजयी' सैनिकांना अभिवादन करण्यासाठी शांघायच्या सर्व नागरिकांना त्या दिवशी सक्तीने चँग-कै-शेकचे झेंडे हाती घेऊन रस्त्यावर उभे राहावे लागले. 'विजयी' सैनिकांच्या रांगाच्या रांगा रस्त्यातून पुढे सरकत होत्या, कम्युनिस्टांशी पुन्हा लढण्यासाठी ! परंतु सैनिक पुढे चालले होते ते मात्र चुकीच्या दिशेने. शांघाय शहराला ज्या बाजूने लाल सैन्य वेढा देऊन बसले होते त्या बाजूला न जाता ज्या वाटा कम्युनिस्टांनी मोकळ्या सोडल्या होत्या त्या दिशेने कोमिन्टांग सैन्य जात होते. ते सरळ सरळ पळून जात आहे हे लक्षात यायला शांघायच्या नागरिकांना फार उशीर लागला नाही.

कम्युनिस्ट फौजांनी चीनमध्ये जेव्हा शहरांविरुद्ध आक्रमक धोरण स्वीकारले, तेव्हा सर्व लहानमोठ्या शहरांमधून शांघायप्रमाणेच थोड्याफार प्रमाणांत हीच परिस्थिती होती. लाल सैन्याने एकेक धक्का देण्याचा तेवढा अवकाश होता.

आणि या वेळी मात्र माओने आणि लाल सैन्याने शहरांनाही धक्के द्यायचे ठरविले. आतापर्यंत लाल सैन्याचे धोरणच होते, की मोठ्या शहरांच्या वाटेला जायचे नाही. शहरांवर हल्ले करण्याच्या फंदात पडायचे नाही. आतापर्यंत लाल सैन्याचा पवित्रा सतत बचावाच्या स्वरूपाचा होता. हल्ले करायचे तेही गनिमी स्वरूपाचे. आता मात्र मात्रोने आक्रमक धोरण स्वीकारायचे ठरविले.

डिसेंबर १९४७ मध्ये उत्तर शेन्सीमध्ये चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीची एक बैठक भरविण्यात आली. या बैठकीत लाल सैन्याचे 'लोकांची सेना' (पीपल्स लिबरेशन आर्मी) असे नामकरण करण्यात आले आणि शहरांवर आक्रमक हल्ले करून ती ताब्यात घेण्याचा निर्णय पक्का करण्यात आला. अगोदर छोटी छोटी शहरे घेत, मग मोठ्या शहरांकडे वळायचे. ज्या शहरांची संरक्षण-व्यवस्था दुर्बल आहे ती शहरे अगोदर ताब्यात घ्यायची आणि मग हळू हळू मक्कम, सुरक्षित शहरे पायरी पायरीने घ्यायचीं, असे ठरविण्यात आले.

झाले. आतापर्यंत ग्रामीण भागात दबा धरून बसलेले लाल सैन्य आता कोमिन्टांगच्या ताब्यात असलेल्या शहरावर हल्ले करू लागले. कोमिन्टांग सैन्यात आता पूर्ण निरुत्साह आणि भीती पसरली होती. सैनिकांचा आणि अधिकाऱ्यांचा चँगवरील विश्वास उडाला होता. सैन्याच्या तुकड्याच्या तुकड्या लाला सैन्याला एकही बंदुकीची गोळी न झाडता शरण जाऊ लागल्या. झाडावरील पिकलेली फळे सहजपणे तोडावीत त्याप्रमाणे लाल सेना कोमिन्टांगच्या ताब्यातील एकेक शहरे काबीज करू लागल्या.

### झंझावाती विजय

प्रांताच्या राजधान्या एकामागून एक कम्युनिस्टांच्या हाती पडू लागल्या.

जानेवारी १९४९ च्या मध्याला तियेनस्तीन पडले. अवघ्या पंधरवडाभरात शरण आलेल्या पेकिंगमध्ये लाल सैनिक शिरले. २३ एप्रिलला लाल फौजांनी नानकिंग काबीज केले. दुसरेच दिवशी शान्सी प्रांताची राजधानी तैयुआनवर लाल झेंडा फडकला. त्यानंतर आठवडाभराच्या आत हंगचो आणि यांगत्सेवरील सुप्रसिद्ध शहर वुहात पडले.

लाल सैन्याला आता कुठल्याच सीमा उरल्या नाहीत. झंझावाती वादळाप्रमाणे दिसेल त्या अडथळ्याला वाकवीत त्या पुढे निघाल्या. यांगत्से नदीवर त्यांना थोपविण्याचा चॅंगने प्रयत्न करून पाहिला; पण सैन्याने नदीही ओलांडली आणि डिसेंबर १९४९ पर्यंत चीनमधील सर्व प्रमुख शहरे आणि प्रांत लाल सैन्याच्या ताब्यात आले.

आणि लाल सैन्य जिथे जिथे जात होते, तिथे तिथे त्याचे स्वागतच होत होते. शहरांमध्ये लाल सैन्य तर अपरिचितच होते. त्यामुळे सैनिकांना पाहताच लोकांना आश्चर्याचा धक्का बसे. कोमिन्टांगच्या प्रचारामुळे त्यांची लाल सैन्याविषयी भलतीच कल्पना झाली होती.

## लाल सैन्याचे दर्शन

शांघाय या शहरात लाल सैन्याचे कसे आगमन झाले, याचे सुरेख वर्णन रॉबर्ट गुलेन या फ्रेंच पत्रकाराने केले आहे.

" अराजकाच्या काळात स्थिरता प्राप्त करून देईल, असा कोणताही मार्ग स्वीकारणीय असतो. शांघायच्या लोकांनी कोमिन्टांग प्रचारकांकडून कम्युनिस्टांबद्दल 'वाट्टेल' त्या गोष्टी ऐकल्या असल्या तरी शांघायचे लोक सारखे म्हणत होते– 'येऊ देत त्यांना. यापेक्षा ते आमचं आणखी काय वाईट करणार!'

" आणि खरोखरच एके दिवशी सकाळी ते आले.

" ते आले. शहराचे रस्ते मोकळे होते. नावापुरत्या दोन-चार तुरळक गोळ्या त्यांच्यावर स्वागतासाठी झाडल्या...हिरव्या गणवेशांमध्ये छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये चपळाईने हालचाली करीत ते भराभरा मोक्याच्या जागा पकडीत होते. ती खरोखरच आश्चर्यकारक घटना होती. हाती जुन्या बंदुका असलेल्या, पायांत साध्या चपला घातलेल्या त्या थकल्या भागल्या सैनिकांच्या छोट्याशा कंपनीने चीनमधील सर्वांत मोठे शहर चकमकीशिवायच काबीज केले. चीनमधील दूरदूरच्या प्रदेशांतून आलेल्या त्या सैनिकांनी, विमानांच्या आणि मोठ्या तोफखान्याच्या मदतीशिवाय लढे देत अमेरिकन शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असलेल्या कोमिन्टांग सैनिकांच्या संरक्षणाखालील शांघाय शहराचा–मांडवलवाल्यांच्या आशियातील बालेकिल्ल्याचा–सहज कबजा केला. अवूनमधून ते शेतकरी सैनिक माना वर उंचावून शांघायमधील वीस-वीस मजली इमारतींकडे मोठ्या आश्चर्याने बघत होते. अशा गोष्टी त्यांनी आयुष्यात प्रथमच पाहिल्या होत्या. त्यांचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच

बसत नव्हता.

" अत्यंत शिस्तबद्ध रीतीने ते सैनिक आपल्या अधिकाऱ्यांच्या मागोमाग पवित्रे घेत पुढे सरकत होते. अधिकाऱ्यांचा गणवेश तंतोतंत त्यांच्या साध्या सैनिकांसारखाच होता. आघाडीची पथके आल्यानंतर अवघ्या पंधरा मिनिटांत सैनिकांनी हलते फील्ड टेलिफोन्स बसविले. विजयी तावडतोब सुसंघटित झाले होते. शांघाय शहराने एवढी शिस्तबद्ध आणि कार्यक्षम सेना कधीच पाहिली नव्हती.

" 'दुसऱ्या ग्रहावरून तर हे लोक आले नाहीत ना', असे कौतुकमिश्रित आश्चर्याचे उद्‌गार एका प्रेक्षकाने काढले. त्याचे हे उद्‌गार म्हणजे आश्चर्यचकित झालेल्या शांघायच्या सर्वच लोकांच्या मनचे बोल होते. नीटपणे लढणारा, शहर जिंकल्यानंतर लूटमार न करणारा, घरामध्ये घुसून बाया-मुलांवर हात टाकण्याऐवजी फूटपाथवर झोपणारा, लोकांनी आपणहून दिलेला भात किंवा चहा सौजन्याने नाकारणारा, ट्रॅमच्या तिकिटांचे पैसे आपणहून देणारा चिनी सैनिक शांघाय शहरामध्ये आजपर्यंत कुणी पाहिला नव्हता. त्यामुळे लाल सैन्य कोठून दुसऱ्या ग्रहावरून तर आले नाही ना, अशी शंका त्यांना येणे रास्त होते.

आणि हे परग्रहावरचे लोक फक्त सैन्यातच दिसत नव्हते, तर लवकरच शासनातही दिसू लागले. शांघायकरांचा विश्वासही बसणार नाही एवढे ते साधे आणि भ्रष्टाचारविरहित होते– "

साऱ्या शहरांमध्ये, खेड्यांमध्ये लाल सैन्याचे असेच स्वागत होत होते. जयजयकार होत होता आणि एकाएकी सर्वत्र माओ–त्से–तुंगविषयीच्या प्रेमाला उत्स्फूर्त उधाण आले. चँग–कै–शेक ज्या वेळी आपली उरली सुरली सेना घेऊन तैवान बेटावर जाण्याच्या तयारीत होता, त्या वेळी त्याने ज्या माओच्या डोक्यावर लक्षावधी डॉलर्सचे बक्षीस लावले होते, त्याची प्रचंड चित्रे लोक उत्स्फूर्तपणे मिरवू लागले. बावीस वर्षे माओने दऱ्याखोऱ्यांमध्ये जीव वाचविण्यासाठी वणवण भटकत काढली होती, त्याच्या श्रमांचे आता चीज झाले. ज्या क्रांतीचा चिनी तरुणांनी गेली पन्नास वर्षे ध्यास घेतला होता, ती क्रांती आता घडून आली होती. पन्नास कोटींच्या अवघ्या चीनवर आता लाल सत्ता प्रस्थापित झाली होती. लोकसंख्येने जगांतील सर्वांत मोठे असलेले राष्ट्र आता कम्युनिस्ट अंमलाखाली आले होते. जगाच्या इतिहासातील ही एक ऐतिहासिक घटना होती.

## स्टॅलिनची प्रतिक्रिया

त्यावर स्टॅलिनची प्रतिक्रिया काय होती ? माओचे सैन्य ज्या ज्या शहरांमध्ये घुसून ताबा घेत होते त्या त्या शहरांमधील रशियन कॉन्स्युलेटस् स्टॅलिन तावडतोब बंद करीत होता. इतर देशांची कॉन्स्युलेटस् मात्र चालूच होती. २५ मार्च १९४९ रोजी माओचे आणि त्याच्या विजयी सैन्याचे चीनची राष्ट्रीय राजधानी पेकिंग येथे प्रचंड स्वागत झाले तरीही स्टॅलिनला माओचे नेतृत्व मान्य नव्हते. नानकिंग

ही कोमिन्टांग सरकारची राजधानी होती. एप्रिल १९४९ मध्यें लाल सैन्याने ती काबीज केली, तेव्हा कोमिन्टांगची राजधानी कँटॉनला आणण्यात आली. इतर सर्व देशांचे राजदूत नानकिंगमध्येच राहिले; पण रशियन राजदूत मात्र कोमिन्टांग सरकारबरोबर कँटॉनला आला. चँग–कै–शेक मुख्य भूमीवरून पळ काढीपर्यंत स्टॅलिनचा त्याला पाठिंबा होता.

१ ऑक्टोबर १९४९ रोजी कम्युनिस्टांच्या ताब्यात आलेल्या चीनच्या नव्या राजवटीचा–पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाचा–जन्म झाल्याचे माओने पेकिंगहून अधिकृतरीत्या घोषित केले. माओ–त्से–तुंग या नव्या सरकारचा अध्यक्ष होता.

चीनच्या इतिहासात कधी न घडलेली विस्मयजनक क्रांती आता सफल झाली होती. अवघा चीन आणि त्यामधील पंचावन्न कोटी लोक प्रथमच दृढ अशा एक-छत्री अंमलाखाली येत होते. हजारो वर्षे जुलमी सम्राटांच्या किंवा हुकूमशहांच्या टाचेखाली चीन सुस्तपणे पडला होता. आपसांत एकी नव्हती. एक ध्येय नव्हते. कोटयवधी लोकांची शक्ती सुस्तावून पडली होती. आज चीनमध्ये नवी हुकूमशाही आली होती; पण ही हुकूमशाही अगदी वेगळी होती. जगाला या नव्या राजवटीची दखल घ्यावी लागणार होती ! कारण या कोटयवधी लोकांच्या हातातील बळ एकत्र करून नवनव्या करामती करून दाखविण्याची ईर्ष्या या नव्या क्रांतिकारकांच्या मनात होती. आजपर्यंत कधी कुणी केले नाहीत, असे प्रयोग जगाला करून दाख-विण्याची त्यांची तयारी होती. देशातील सुप्त शक्तीला हवी तशी वापरण्याची क्षमता त्यांच्यांत होती. ती प्रचंड आणि अक्राळविक्राळ शक्ती आता खडबडून जागी झाली होती.

## परिपूर्ण क्रांतीतील पहिला टप्पा !

लष्करी क्रांती सफल झाली होती. माओच्या परिपूर्ण क्रांतीच्या स्वप्नातील हा पहिला टप्पा होता. चीनमध्ये सामाजिक, बौद्धिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक क्रांती घडवून आणण्यासाठी उचललेले हे पहिले पाऊल होते. आणखी किती तरी पुढे जायचे होते. चीनमध्ये त्यांच्या स्वप्नींचे नवे युग यायला आणखी बराच अव-काश होता. त्यासाठी त्याला स्वकीयांशी-परकीयांशी भांडावे लागणार होते.

पेकिंगमधील तियेन–आन–मेन चौकात नव्या चीनच्या जन्मदिनानिमित्त विजयी लाल सेनांची सलामी स्वीकारताना माओ–त्से–तुंग आणि त्याचे सहकारी यांना नक्कीच कृतकृत्यतेचा आनंद झाला असेल. अवघ्या दोन वर्षांत प्रचंड भरारी मारून लाल सैन्याने मिळविलेल्या या यशाने सारे जग ज्याप्रमाणे स्तिमित झाले होते, त्याचप्रमाणे कम्युनिस्ट नेतेही स्वतः आश्चर्यचकित झाले होते ! एवढ्या लवकर हे घडेल याची त्यांना कल्पना नव्हती. दोनच वर्षांपूर्वी शेन्सी प्रांतातील गुहांमध्ये त्यांना आश्रयासाठी राहावे लागत होते. आज त्यांच्या हाती चीनची अनिबंध सत्ता आली होती. १९४६ मध्ये माओला वाटत होते, चीनमध्ये कम्युनिस्ट



'आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे'...

माओ-त्से-तुंग



ती प्रचंड आणि अक्राळ-विक्राळ शक्ती आता जागी झाली होती. अविकसित अशा 'ग्रामीण' आफ्रो-आशियाई व लॅटिन अमेरिकन देशांनी युरोप-अमेरिकेच्या साम्राज्यवादी 'शहरी' देशांना वेढे देऊन ते जिंकून तेथे चिनी साम्यवाद प्रस्थापित करणे हे या जागृत शक्तीचे अखेरचे उद्दिष्ट होते . . .

क्रांती होण्यास अजून वीस वर्षे लागतील. परंतु झंझावाती विजय अनपेक्षित होता.

म्हणून स्वातंत्र्यदिनाच्या आपल्या भाषणात माओ म्हणत होता–" आम्ही विजयी झालो. आता साऱ्या जगाचा थरकाप उडू दे.– "

आणि खरोखरच साऱ्या जगाचा थरकाप उडाला. शतकानुशतकाच्या सुस्तपणानंतर अत्यंत कर्मठ अशा कम्युनिस्ट चाबकाच्या फटकाऱ्याने अक्राळविक्राळ शक्तीचा चीन खडबडून जागा झाला होता. आणि आता तो काय उत्पात घडवून आणणार याकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले.

**समाप्त**

# संगीताची गंगोत्री—लोकसंगीत

“नमस्ते कुमारजी.”

“नमस्ते.”

“कुमारजी, लोकगीतांचं आकर्षण तुम्हांला केव्हापासून वाटू लागलं ?”


“लोकगीतांचं आकर्षण मला वाटण्यापेक्षा सुरुवातीला लोकगीतांनाच माझं आकर्षण वाटू लागलं.”

“अच्छा ! ते कसं काय ?”

“ते कसं काय ते सांगतो. आमचे गुरुजी म्हणजे प्रोफेसर देवधर. पूर्वी मुंबईला त्यांच्याकडे शिकायला होतो. त्या वेळी त्यांनी काही प्रोग्रॅम रेडिओत केले होते. लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीत यांचं साम्य असणारा, असा एक प्रोग्रॅम केला होता. एक होळीचाही प्रोग्रॅम केला होता, तर त्या काही प्रोग्रॅमच्या संपर्कात मी होतो. काहींत भाग घेतला होता.”

“काही गाणी म्हटली होती का तुम्ही ?”

“हो, गाणी म्हटली होती. बरीच मुलं होती, मुली होत्या. आम्हीपण होतो त्यांच्यामध्ये. तर त्या वेळी माझा लोकगीताशी परिचय झाला. आमच्या गुरुजींनी बरीच पुस्तके आणली होती लोकगीतांची. त्यांतल्या साहित्याची वगैरे. तर ती वाचण्यात आली होती माझ्या. बसल्या ठिकाणी ती चाळून बघत असे मी. कळत नसे काही. पण चाळून बघायची. जसं लहान मुलं नवीन खेळण्याकडे बघतात तसं. पण या पलीकडे काही माझ्याकडून त्या वेळी झालं नाही. ते तसंच राहून गेलं. त्यानंतर मी मध्यप्रदेशात—म्हणजे माळव्यात—गेलो. आजारी पडल्यानंतर तर त्या आजारीपणात पुष्कळ माझ्या वाचण्यात



# कुमार गंधर्व

मुलाखत
अरविंद गजेंद्रगडकर

आलं. साहित्य वाचलं, लोकगीतावर जे जे मिळेल ते ते मी वाचलं, पडल्यापडल्या मी विचार करीत असताना, जुन्या ज्ञानातून एक एक नवे विचार बाहेर पडू लागले. त्याच वेळी कानांवर लोकगीताचे स्वर पडतच होते. लोकगीतांचा आणि शास्त्रीय संगीताचा काहीतरी संबंध आहे, असं आताप्रमाणं त्या वेळीही लोक बोलतच होते. आमचे गुरुजीही बोलायचे, पण नक्की काय संबंध आहे याबद्दल कुणी काही सांगितलं नव्हतं ! हे सर्व विचार माझ्या डोक्यात होतेच. काहीतरी संबंध असलाच पाहिजे या दृष्टीने मी पाहू लागलो. बघता बघता मला वरंच साम्य दिसू लागलं. जसजसा अभ्यास वाढू लागला तसतसा मी लोकगीतांकडे जास्ती आकर्षिला जाऊ लागलो. लोकगीतांच्या अभ्यासाशिवाय शास्त्रीय संगीताचं उत्थान होणं शक्यच नाही, या निष्कर्षाला मी आलो."

"लोकगीतांतल्या नेमक्या कोणत्या गोष्टींचं आकर्षण तुम्हांला वाटलं ?"

**विराट स्वरूपाचे दर्शन**

"सध्याच्या चालू घडीच्या संगीताव्यतिरिक्त अजून कितीतरी संगीत पडलेलं आहे. (संगीताचे अनेक प्रकार दुर्लक्षित आहेत.) तिकडं आपणं बघितलेलंच नाही. स्वर म्हणा, लयींचे प्रकार म्हणा, शब्दांचा उपयोग म्हणा, उच्चार म्हणा, हे सर्व प्रकार पडलेले आहेत ! संगीतातला आपण कुठला

तरी एक भाग घेऊन बसलेले आहोत. तोदेखील पूर्ण होत नाही. ही गोष्ट वेगळी. पण फार विराट स्वरूप अजून वाट पाहत पडलेलं आहे."

"या विराट स्वरूपाचं दर्शन तुम्हांला लोकगीतांत झालं का ?"

"हो, त्याचं मला दर्शन लोकगीतांत झालं."

"नवीन असं तुम्हांला काय मिळालं ?"

"वेगळे स्वर, किंवा स्वरस्थानं मला तिथं दिसली."

"म्हणजे ?"

"उदाहरणच देऊन सांगतो. आपला दरबारी राग आहे. दरबारी रागाचं वैशिष्टय कोणतं ? त्याचं वैशिष्टय म्हणजे त्याचा तो गांधार, होय की नाही ? हा गांधार काढून टाकला तर दरबारी रागात काहीच राहणार नाही. ज्या कोणी हा राग निर्माण केला त्याला हा गांधार कुठं तरी आधी ऐकू आला असेलच, हा गांधार त्याला कुठं तरी सापडला असला पाहिजे."

"म्हणजे आधी हा स्वर सापडला किंवा ऐकू आला आणि मग त्या स्वरांच्याभोवती हा राग निर्माण केला का ?"

"हो, त्या गांधारासाठी दरबारची निर्मिती झालेली आहे.

"अच्छा."

"तर या लोकगीतांमध्ये मला वेगळी वेगळी स्वरांतरं, वेगळे वेगळे आकार (आकृतिबंध) दिसू लागले."

"लयींचेपण वेगळे प्रकार आढळले का ?"

"हो. लयींचेपण वेगवेगळे आकार–प्रकार मला सापडले. लोकगीतांत वापरले जाणारे जे छोटे ताल आहेत त्यांच्यावरूनच तालशास्त्राची रचना झालेली आहे."

"म्हणजे तीन आणि चार मात्रांचे ताल आणि त्यांची स्थित्यंतरं का ?"

"हो. दोन-तीन आणि पाच हा पहिला टप्पा येतो, त्यानंतर आठचा टप्पा येतो आणि संपतं. आठपर्यंतच ठोके आहेत. तिथं संपतं सगळं."

"मग पुढे त्याचीच पुनरावृत्ती होते का ?"

"हो. पण, त्यात संवाद आहे."

"म्हणजे स्वरांत 'सा' आणि 'म' किंवा 'सा' आणि 'प' यांचा जसा संवाद आहे, तसा तालातपण संवाद आहे का ?"

"हो, तसाच संवाद आहे. म्हणजे मूळ निसर्गात काहीतरी घडतं आणि त्याची प्रतिक्रिया आपल्यावर घडते. याशिवाय वेगळं असं काही घडू शकत नाही."

"म्हणजे तुम्हांला निसर्गाचं प्रतिबिंब या लोकगीतांत दिसलं म्हणून तुम्ही लोकगीतांकडे आकर्षिले गेलात का ?"

"हो, त्यामुळेच लोकगीतांविषयीचं माझं आकर्षण वाढलं."

## शास्त्रीय संगीताचं उगमस्थान

" बरं कुमारजी, वेगवेगळ्या प्रांतांतली जी निरनिराळी लोकगीतं आहेत त्यांच्यांत समान सुरावट किंवा काही साधर्म्य तुम्हांला आढळलं का ?"

" तसं साधर्म्य पुष्कळ आढळतं. काही काही गीतं ऐकून तर आपल्याला महाराष्ट्रातलंच एखादं गाणं ऐकतो आहोत असं वाटतं."

" पाळणे किंवा अंगाई गीतं यांची सुरावट सर्व प्रांतांत जवळ जवळ सारखीच आहे असं म्हणतात. ते खरं का ?"

" साम्य वाटतं, पण दुर्बीण लावून बारकाईनं पाहिलं तर वेगळेपणा दिसून येतो, पण सुरावटी मात्र सारख्या वाटतात."

" बरं, मग शास्त्रीय संगीताचा उगम लोकगीतांतूनच झालाय असं तुम्हांला म्हणायचं आहे का ?"

"हो, शास्त्रीय संगीताचा उगम तिथूनच झाला आहे, याबद्दल माझे विचार आता पूर्ण झालेले आहेत. हे विचार आता मी बदलू शकत नाही. शास्त्रीय संगीतातले जे काही राग आहेत त्यांचा उगम मला लोकगीतांत सापडतो."

" उदाहरणार्थ ?"

" मालकंस आहे, देसी आहे, भैरवी आहे, तोडी आहे."

" हिंडोल ?"

" नाही, हिंडोल नाही. बागेश्री आहे."

" हिंडोल का नाही ?"

" ते सगळं सांगायला खूप वेळ लागेल. आपल्याजवळ तेवढा वेळ नाही आहे."

" बरं बरं."

" तर हे सर्व स्वतंत्र स्वरूपाचे राग आहेत. यांचं मूळ मला लोकगीतांत सापडलं."

" बरं भूप ?"

" हो, भूप तर लोकगीतांत फार आहे. दुर्गासुद्धा आहे."

" सारंग ?"

" सारंग तर लोकगीतांत आकाशासारखा पसरला आहे. सारंगाचे सगळे प्रकार लोकगीतांत सापडतात ."

" बरं कुमारजी, रागदारी गाणाऱ्याला या लोकगीतांच्या अभ्यासामुळे काही फायदा होईल का ?"

" हे ज्या त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. लोकगीतांत कुणाला काय दिसेल ते सांगता येत नाही. कुणाची प्रतिभा जागृत होईल. लोकगीतांतल्या स्वरावलीचा घाट पाहून एखाद्याला एखादा निराळा आकार सुचेल. मोडतोड करून काही करता येईल. हे ज्याच्या त्याच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. कोणाला काय दिसेल हे सांगता येत नाही. मी फक्त शास्त्रीय संगीतातल्या रागांचं मूळ (धुना) लोकगीतांत

शोधत होतो, पण आणखी कुणाला काय सापडेल हे सांगता येत नाही ! ती प्रसिद्ध गोष्ट माहीत आहे की नाही ?"

"कोणती ?"

## स्वतंत्र राग आणि संकीर्ण राग

"आंधळे आणि हत्ती ? "

"ओ हो, आलं लक्षात."

"तसंच लोकगीतांचं आहे. कुणाच्या हाताला जे लागेल त्यावरून तो लोकगीतांचं स्वरूप ठरवू पाहतो. पण लोकगीत म्हणजे समुद्रासारखं विराट आहे."

"मग तुम्हांला नवीन रागांची जी स्फूर्ती मिळाली ती या लोकगीतांच्या अभ्यासामुळे का ? "

"नाही. आधी मी आपले जे जुने राग आहेत त्यांचे संवाद बघू लागलो."

"संवाद म्हणजे काय ? ज्याला जबाब म्हणतात ते का ? "

"जबाब साधा शब्द झाला. संवाद म्हणजे सबंध रागात संवाद व्हायला पाहिजे."

"म्हणजे कस ? "

"त्याला फार वेळ लागेल. अगदी फंडामेंटल गोष्टींत जावं लागेल."

"नाही. एखादं उदाहरण दिलंत तरी चालेल."

"म्हणजे रागाचे चार भाग मी मानतो आणि या चारी भागांचा एकमेकांशी संवाद व्हायला पाहिजे. पुन्हा या संवादांची वेगळी वेगळी रूपं आहेत. एक रूप नाही."

"असं असं."

"तर असे संवाद मी बघू लागलो. पण हे संवाद मला कुठे मिळेनात. म्हणून मी लोकगीतांकडे वळलो आणि तिथे मी हुडकत होतो ते सापडलं."

"पण कुमारजी, आपल्याकडे आधीच इतके असंख्य राग असताना पुन्हा तुम्हांला नवीन राग निर्माण करण्याची आवश्यकता का वाटली ? "

"असंख्य राग आहेत असं आपण म्हणतो, पण ते जे राग आहेत ते कुठल्या स्वरूपाचे आहेत ? स्वतंत्र स्वरूपाचे आहेत की संकीर्ण आहेत ? आता गोरखकल्याण घ्या किंवा पटदीप घ्या किंवा चालूच चंद्रकंस घ्या. हा चंद्रकंस तर आमच्या गुरुजींनी केलेला राग आहे. पण त्याचा फार प्रचार झाला म्हणून आमचे गुरुजी बोलत नाहीत एवढंच. तर सांगायचं म्हणजे हे सर्व संकीर्ण राग म्हणजे एका रागावरून तयार झालेले राग आहेत."

"म्हणजे ? मूळ रागावरून का ? "

"हो, मूळ रागावरून. पण मूळ राग असे किती आहेत, अगदी स्वतंत्र रूप असलेले राग किती आहेत हे मला संगीतकारांनी सांगावे. म्हणून मी जे काही

दहा-बारा राग केले आहेत या रागांना मी स्वतंत्र रूप म्हणतो. ती मिश्रणं नाहीत. एका रागात दुसरा राग मिसळून केलेले नाहीत."

"ठीक आहे कुमारजी. पण तुम्ही केलेल्या रागांतसुद्धा दुसऱ्या रागांच्या छटा दिसतातच."

"छटा दिसणं म्हणजे, तुमच्यासारखं मी दिसणं किंवा माझ्यासारखं आणखी कोणी दिसणं हे निराळं. हे साम्य नव्हे. स्वतंत्र व्यक्तित्व पाहिजे त्या रागाचं."

"मग रागाची अशी स्वतंत्र रूपं हुडकत असताना तुम्हांला या नवीन रागांची कल्पना सापडली का ?"

## स्वतंत्र रागांची कसोटी

"हो, मूळ काही तरी पाहिजे ना ? मी जे हे नवीन राग केले त्यांत मी स्वत: काही केलेलं नाही. जे आहे त्याचं परिष्कृत रूप फक्त मी मांडलं आहे."

"तुमची मालवती पण अशीच आहे का ?"

"मालवती घ्या, लगनगांधार घ्या किंवा संजारी घ्या. मी काही केलेलं नाही.'

"अस्सं ? मग याचं मूळ ?"

"मूळ आहे. त्याचं परिष्कृत रूप म्हणजेच हे राग."

"अच्छा. म्हणजे पॉलिश करून किंवा सुधारून त्याचं रूप...."

"छे: छे: पॉलिशसुद्धा केलेलं नाही."

"मग ?"

"मी फक्त काही संस्कार केले. त्यांना बुद्धिवादी केलं. त्यांना शहाणं केलं, संसार थाटण्यासाठी. निसर्गात पूर्ण असं काही नसतं. जे काही असतं ते अर्धं असतं. त्याला आपल्याला पूर्ण करावं लागतं. निसर्गात तुम्हांला सोनं शुद्ध स्वरूपात कधी सापडत नाही. तसं सापडलं असतं तर सोपं झालं असतं; पण तसं नाही आहे. ते मातीतून काढून त्याला स्वच्छ करावं लागतं. त्यासाठी प्रचंड मशिनरी आहे. हजार लफडी आहेत. तसंच या रागांच्या मूळ स्वरूपाचं आहे. त्यांच्यावर संस्कार करावे लागतात. असे संस्कार झाले की, मग त्यांची सांगण्याची ताकद वाढते. संकीर्ण राग पाहा. ते फार कमी सांगतात. बागेश्री जितकं सांगू शकेल, भीमपलासी जितकं सांगू शकेल तितकं पटदीप सांगू शकणार नाही; कारण तो बाटलेला आहे. तो ऐकताना आनंद वाटेल. एक वेगळी मौज वाटेल, पण त्याची मर्यादा फारच कमी आहे. भीमपलासीला तशी मर्यादा नाही. तो गायला तुम्हांला कंटाळा येणार नाही."

"प्रत्येक वेळी वेगळं रूप दिसेल म्हणून ना ?"

"हो, प्रत्येक वेळी त्याचं रूप वेगळं दिसेल, कारण तो स्वतंत्र राग आहे."

"कुमारजी, मग ही सांगण्याची अमर्याद ताकद तुम्ही केलेल्या रागात आहे का?"

"हो आहे."

"प्रत्येक रागात आहे ?"

" हो आहे. त्याची एक परीक्षा सांगतो. मी गायलेले राग ऐकून लोकांनी गावं. गाता येणार नाही ऐकून. पन्नास वेळा ऐकलं तरी येणार नाही, पटदीप ऐकून लगेच गाता येईल. "

" पण मग कुमारजी, तुमच्या दृष्टीनं स्वतंत्र असलेला भीमपलास कोणीही गातंच की, नुसतं ऐकूनही गातात, मग ? "

" हो गातात ना, पण त्या रागाचे संस्कार होत आले आहेत पुष्कळ. "

" ओ हो ! म्हणजे पुढच्या पिढीवर तुमच्या रागांचे संस्कार झाले तर हे तुमचे राग गाता येतील. "

" हो, किंवा शिकविल्यानंतर गाता येतील. लगनगांधार कितीही वेळा ऐकला तरी गाता येईलच असं नाही ! फारतर त्याची नक्कल करता येईल. पण पटदीपचं तसं नाही. भीमपलास येत असतोच. त्यामुळे त्यात निषादाचा फरक केला की तो पटदीप होतो, तो ऐकूनच गातात. तो कोणी कोणाला शिकवलेला नाही. "

" बरं, आता रागाची जी वर्गीकरणाची पद्धत आहे सध्या आपल्याकडे, थाट पद्धती म्हणा, रागांग पद्धती किंवा मेल पद्धती, तर यांतली एखादी पद्धत तुम्हांला आवडते की तुमची एखादी स्वतंत्र विचारसरणी आहे ? "

" मी स्वतंत्र रागपद्धती मानतो, आपण फक्त हिंदुस्थानी संगीत पद्धतीबद्दलच बोलतो आहोत, हे गृहीत धरतो मी. "

" अर्थात, अर्थात. "

" तर प्रत्येक राग स्वतंत्र आहे. म्हणून स्वतंत्र रागपद्धतीवरच माझा विश्वास आहे. "

" म्हणजे कोणत्या थाटात त्याला बसवता येणार नाही का ? "

" नाही. शिकवायच्या दृष्टीनं सोपं करण्यासाठी म्हणून ते ठीक आहे. पण कलेच्या दृष्टीनं याचा काहीही उपयोग होत नाही ! कारण आपले सर्व राग स्वतंत्र आहेत. "

" प्रत्येक रागाचं रूप वेगळं आहे म्हणून का ? "

" हो. प्रत्येक राग म्हणजे थाट आहे. जर थाटाची तुमची वेगळी व्याख्या असेल तर तो कुठल्याही दुसऱ्या थाटात बसायला तयार नाही. प्रत्येक राग म्हणजे स्वतःच एक मोठा ऑफिसर आहे. तो कुणाच्या हाताखाली काम करायला तयार नाही. "

## ध्रुपद गायकीचा लोप

" बरं कुमारजी, ध्रुपद गायनाविषयी तुमचं काय मत आहे ? आता ही पद्धत लुप्त होत चालली आहे. तर ही ध्रुपद गायनी आपण आवर्जून टिकवावी की, आपलं काळाकडे तिचं भवितव्य सोपवून द्यावं ? "

" मला वाटतं तिला काळाकडे सोपवलेलं चांगलं. "

" टिकविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज नाही का ? "

" कसं टिकवणार ? "

" लोकांना शिकवून म्हणा किंवा ... "

" कसं टिकवायचं हा एक प्रश्नच आहे. जुन्या गोष्टींबद्दल अभिमान असू शकतो. पण ख्याल गायकी आता इतकी वाढलेली आहे की, ध्रुपद टिकवणं म्हणजे हट्ट होईल नुसता. "

" लोकप्रिय नाही होणार ? "

" लोकप्रिय होणार नाही. "

" पण काय हो कुमारजी, ध्रुपदातलं गांभीर्य लोकांना जाणवतं. त्याचं ते 'अपील' जाणवतं. पण तरीही ते लोकप्रिय का झालं नाही ? "

" त्याच्यामध्ये काय आहे की लयकारीचा जो काही भाग आपण ऐकत आलो त्याच्यामध्ये हिशेबच फक्त आहे. कलेचा भाग फार कमी आहे. "

" मला वाटतं भावनेलापण फार कमी स्थान आहे. "

" नाहीच. "

" त्यामुळे ते मागे पडलं का ? "

" हो. त्यामुळेच ते मागे पडलं. तसं ध्रुपद - धमार पाठांतराला फार सोपं आहे. ख्यालापेक्षा. कारण सगळं बसवलेलं असतं. "

" सगळे बंदिशीचे हिशेब बसवून टाकलेले असतात, दुगण, तिगण वगैरे, म्हणूनच सोपं ना ? "

" हो. म्हणजे तालाच्या आकाराला धरून ध्रुपद बसवलेलं असतं. जसा तालाचा आकार तसाच ध्रुपदाचा आकार. पण ख्यालाचं तसं नाही. ख्यालाला स्वत:चा असा स्वतंत्र आकार आहे. ख्यालाची बंदिश म्हणजे एका आकारात बसवलेला दुसरा आकार. ध्रुपदात ध्रुपद हे तालाला समांतर जातं. तसं ख्यालाचं नाही. ख्यालात ख्याल आणि ताल यांच्या दिशा समांतर नसतात. वेगळ्या वेगळ्या असतात. ख्याल म्हणूनच सारखा नटवत जावं लागतं. तसं ध्रुपदाचं नाही. ते साचेबंद आहे. "

" म्हणूनच ते मागे पडलं का ? "

" शक्य आहे. शक्य आहे. "

## बंदिशी : जुन्या आणि नव्या

" बरं कुमारजी, आपल्याकडे ज्या परंपरागत चीजा चालत आलेल्या आहेत त्यांबद्दल तुमचं काय मत आहे ? "

" ज्या खरोखरच्या बंदिशी आहेत त्या तर लोकांना आवडतातच. आणि म्हणून त्या प्रचारातपण आहेत. पण ज्या जबरदस्तीच्या बंदिशी आहेत, त्या तर नाहीशा होणार. "

" कुमारजी, तुम्ही हा फरक कसा करता ? खरोखरीची बंदीश आणि जबरदस्तीची बंदीश ? "

" जबरदस्तीची बंदीश म्हणजे काय ते सांगतो. आधी एखादी कविता करायची आणि मग ती कोणत्या तरी रागांत आणि तालांत बसवायची. "

" म्हणजे चाल लावायची का त्या कवितेला ! "

" त्याला चाल लावणंच म्हणायचं. अशा ज्या बंदिशी आहेत त्या जास्त चांगल्या वाटत नाही. पण खरोखरच्या ज्या बंदिशी आहेत, त्यांचा आनंद वेगळा आहे. आपण त्यांना फार आदरानं वागवतो. "

" खरोखरच्या बंदिशीचा तुमचा निकष कोणता ? उत्तम बंदिशीत कोणत्या गोष्टी यायला पाहिजेत तुमच्या दृष्टीने ? "

" ज्या तालात चीज बांधायची त्या तालाचा आकार. ज्या लयीत ती जाणार त्या लयीचा आकार. त्यानंतर प्रत्येक लयीला अनुसरून बदलणारं रागाचं रूप किंवा आकार आणि मग चीजेच्या शब्दांचा अर्थ या तीनही-चारही गोष्टी एकत्र याव्या लागतात. तेव्हा ती उत्तम बंदीश होते. "

" मग कुमारजी, प्रचलित काही बंदिशी या तुमच्या निकषाला पुरत नाहीत ? "

" नाहीच पुरणार. त्या नुसत्या म्हटल्या की हे कळून येईल. "

" मग कुमारजी, तुम्ही ज्या नवीन चीजा केल्या त्या, तुम्हांला अशा बंदिशी मिळाल्या नाहीत म्हणून केल्या का ? "

" ते तर एक कारण आहेच आहे. पण काही गोष्टी पटेनाशा व्हायला लागल्या. काही रागांतल्या बंदिशी म्हणा. तसं म्हटलं तर माझ्याकडे जुनं पुष्कळं आहे. हा एक आधार फार मोठा आहे माझ्याजवळ. आणि चांगलं चांगलं बहुतेक माझ्याकडे आहे. उगीचच्या उगीच ट्रंकेत भरावं, खजीनदार होण्यासाठी, अशा चीजा मी शिकलो नाही; कारण आमच्या गुरुजींना हे आवडत नव्हतं. ज्यांनी ज्यांनी म्हणून मला प्रेमानं शिकवलं ते त्यांच्याकडं जे चांगलं होतं, छान होतं ते त्यांनी मला दिलं. 'हे फार छान आहे. सुंदर आहे, तू हे गा, असं म्हणून त्यांनी मला ते दिलं ' त्यामुळं माझ्याकडं सगळी निवडलेली रत्नं आहेत. "

" तरीसुद्धा तुम्हांला नवीन चीजा कराव्याशा वाटल्या ? "

" हो वाटल्या. कारण रागाचं रूप प्रत्येक वेळी वेगळं वाटतं. त्याच्याकडे तुम्ही जितक्या तऱ्हांनी पाहाल तितकी त्याची रूपं दिसू शकतात. "

" बरोबर. म्हणजे स्वतःच्या प्रतिभेचा एक आविष्कार करण्यासाठी तुम्ही या चीजा केल्यात. "

" हो बरोबर. "

## स्वर, शब्द आणि लय

" बरं कुमारजी, रागदारीत चीजेला आणि शब्दांना तुम्ही कितपत महत्त्व देता ?

काही लोक संगीतातले शब्द म्हणजे स्वर टांगण्यासाठी असलेल्या खुंट्या मानतात; तर तुमचं याबद्दल काय मत आहे ? "

"मी स्वरांना आणि चीजेतल्या शब्दांना वेगळं समजतच नाही. एवढंच नव्हे तर त्यातल्या लयीलादेखील वेगळं समजत नाही."

"म्हणजे तिन्ही मिळून येतात असं तुमचं म्हणणं आहे ? "

"हो. तुम्ही स्वरांकडे जास्ती लक्ष दिलंत तर त्याचा अर्थ असा की तुम्ही लयकारीकडे लक्ष देत नाही. लयकारी तुम्हांला आवडत नाही. त्याबद्दल प्रेम नाही. शब्दांकडे लक्ष नसेल तर ते तुम्ही आपल्या गाण्यातच सांगता. शब्द काय स्वराचा शत्रू आहे का ? अक्षरब्रह्म म्हटलेलं आहे, तर त्याला तुम्ही एवढं दूर का करता ? तुमचं काय त्यानं पाप केलंय ? कारण उच्चारामध्येच नाद आहे ना ? 'अ' म्हणताना अतिशय आनंदानं 'अ' म्हणता यायला पाहिजे. 'ब' पण तसाच म्हणता यायला पाहिजे. प्रत्येक अक्षर हे परमेश्वरी स्वरूप आहे. पण हे असं कोणी समजत नाही."

"म्हणजे तुमच्या दृष्टीने स्वर, शब्द आणि लय या तिन्हींना सारखंच महत्त्व आहे ? "

"हो. सारखंच महत्त्व द्यायला पाहिजे. नाहीतर मग तुम्ही शब्द मुळीच घेऊ नका. बघू तुम्ही कसं गाता. कशातून भाव व्यक्त करता बघू. उगीच मोठी घमेंड मारण्यात अर्थ नाही."

"ठीक, ठीक. बरं कुमारजी, संगीत शिकविणाऱ्यांनी कोणत्या दृष्टीने साधना केली म्हणजे त्यांना ज्ञान लवकर होईल ? तुमचं काय मत आहे यावर ? "

"हा प्रश्न भयंकर कठीण आहे."

"म्हणजे संगीतात शॉर्टकट्स् नाहीत का ? "

"नाही, नाही. संगीतात शॉर्टकट्स् नाहीत."

"पण कुमारजी, माझं म्हणणं असं की एक विचारांची कोणती दिशा अशी पकडावी ? का अठरा घंटे रियाज करो बेटा वगैरे ? "

"नाही, रियाज तर ठीकच आहे. रियाज जरूर करावा. पण काय करावं आणि काय न करावं ? "

"हं. मला तेच विचारायचं आहे. डोळसपणे रियाज केलेला..."

"तेच सांगतो. संगीतामध्ये उच्चाराला माझ्या दृष्टीनं फार महत्त्व आहे. मला नीट बोलता येत नाही हं. मी आधीच सांगतो. माझी सर्व ताकद संगीतात खर्च होते. बोलताना मी फार गडबडतो. पण गाताना शक्य तो गडबड करीत नाही हं. तर गाताना आपण जे उच्चार करायचे किंवा जी अक्षरं काढायची ती फार व्यवस्थित काढावीत. समजा, 'घ' कार काढायचा आहे तर तो 'घ' (छातीतून 'घ' चा उच्चार करून दाखवीत) असा निघायला पाहिजे. याचा आतून जोपर्यंत उच्चार

करीत नाही तोपर्यंत तुमचा तो 'घ'कार नाद घेऊन बाहेर पडणार नाही. म्हणूनच उच्चाराला फार महत्त्व आहे. त्याच्यावरून तुमचा आवाज निघणार आहे. उच्चार जर वरवरचा असेल तर आवाजपण वरवरचा निघेल."

"म्हणजे कुमारजी, आकाराची कल्पना इथे स्पष्ट करायची आहे का तुम्हांला? अक्षरामध्येच नाद लपलेला आहे. आवाज लपलेला आहे. जो तुम्ही पुढे काढणार आहात तो आणि भावसुद्धा?"

"अच्छा म्हणजे याच्याकडे जास्ती लक्ष द्यायला पाहिजे."

"हो, फार लक्ष द्यायला पाहिजे. आणि पूर्ण उच्चार करायला पाहिजे."

"पूर्ण उच्चार म्हणजे?"

"आकाराची सुरुवात आणि शेवट. ते एक गोल असं रूप घ्या तुम्ही. तर हा उच्चार पूर्ण व्हायला पाहिजे."

"म्हणजे तुटकपणा नको असंच ना?"

"हो. तुटकपणा नको. उच्चार केला की, जसा भाव व्यक्त करावयाचा असेल तसा होईल. कोणी काही बोलत असला की त्याच्या मनातलं आपल्याला कसं कळतं? याच्या मनात हे नाही हं हे, हे कसं कळतं? हे कळतं त्याच्या उच्चारावरून. कुठून त्यानं ते अक्षर काढलेलं आहे, कुठून त्यानं तो उच्चार केलेला आहे याच्यावरून कळतं."

"ओ हो, म्हणजे कुमारजी, भावव्यक्तविण्यासाठी असे हे उच्चार अत्यंत आवश्यक आहेत."

"अगदी ते ठरलेलंच आहे. शब्दांचा उच्चार करताना एक ईश्वरी रूप आहे असं समजून करायला पाहिजे. म्हणजे मग आवाजही चांगला येऊ लागेल आणि साधना करायलाही बरं पडेल."

"बरं कुमारजी, आवाज बनविण्यासाठी ही खर्जाची मेहनत आवश्यक आहे का?"

"मला खर्जाची मेहनत नाही पटत. अंहं. हे जुनं काहीतरी वेड आहे असं मला वाटतं."

"असं? मग 'व्हॉईस कल्चर'ची तुमची काय कल्पना आहे?"

## ट्रेनिंग कल्चर . . . वगैरे

"व्हॉईस कल्चरबद्दल मला थोडक्यात असं वाटतं की आवाज आपल्याला जसा पाहिजे तसा काढता यायला पाहिजे, ही पहिली गोष्ट."

"म्हणजे सहजपणे का?"

"सहजपणे तर ठीकच आहे. पण वाटेल तेवढा मोठा काढता यायला पाहिजे आणि वाटेल तसा बारीक काढता यायला पाहिजे. 'व्हॉईस कल्चर'ची माझी ही साधी व्याख्या आहे. तर ते जर काढता नाही आलं तर उपयोग नाही. या खर्जाच्या

मेहनतीमुळं आवाज एकाच प्रकारचा होत जातो. ते 'ट्रेनिंग' होतं. कल्चर नाही; उदाहरणार्थ, फैयाजखाँचा आवाज! एकाच प्रकारचा आवाज ते काढीत असत. असे पुष्कळ लोक आहेत. आपल्या संगीतात व्हॉईस ट्रेनिंगवालेच बहुतेक आहेत. वझेबुवासुद्धा असेच ट्रेनिंगवाले. या आवाज काढण्याच्या पद्धतीवरूनसुद्धा आपल्याकडे घराणी झालेली आहेत; पण वाटेल तसा आवाज काढता येणं याला मी 'व्हॉईस-कल्चर' म्हणतो."

"म्हणजे आवाज हवा तसा वळवणं का?"

"वळवणं तर झालंच. पण तो नरमही होऊ शकतो, कठीणही होऊ शकतो. मोठा होतो, निमूळता होऊ शकतो, स्क्वेअर होऊ शकतो, गोल होऊ शकतो, त्रिकोणाकृती होऊ शकतो."

"ओ हो, म्हणजे हे सगळं त्या आवाजात यायला पाहिजे."

"हो. या सर्व गोष्टी यायला पाहिजेत."


"मग त्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत?"

"ते शिकलं पाहिजे. आता असं म्हणतात की, परदेशामध्ये गाणं शिकवायच्या अगोदर दोन वर्षे नुसता आवाज काढायला शिकवतात. आपल्याकडे असा विद्यार्थी कोण येईल? दोन वर्षं आवाज काढायला शिकवतो आणि आवाज काढता आल्यानंतर मी गाणं शिकवीन असं म्हटलं तर कोण टिकणार आहे? तिथं अगोदर आवाज काढायला शिकवतात. आवाज काढता येऊ लागला म्हणजे मग संगीत शिकवतात. आपल्याकडे लोक आवाज व्यवस्थित काढतच नाहीत."

"मग कुमारजी, यासाठी एखादी साधना तुम्हांला सुचवायची आहे का?"

"ती अशी दोन शब्दांत नाही सांगता येणार; पण स्वतःचा आवाज आपण आधी ऐकायला पाहिजे. नुसतं दुसऱ्यांनी ऐकून नाही चालत. आपले कान तोंडाच्या मागे असतात. (हसून) त्यामुळेच आपण आपला आवाज सहसा ऐकत नाही. फक्त लोकच ऐकतात. म्हणून मी म्हणतो की, आधी आपण आपला आवाज ऐकला पाहिजे. आपल्याला आधी आवडायला पाहिजे. हा विचार कोणी करीत नाही. नुसता लोकांना आवडून काय करायचं आहे? संगीत म्हणजे पूजा आहे. साधना आहे. पूजा करताना लोकांना चांगलं दिसून काय करायचं आहे. आपल्या आवाजाचा आपल्याला आनंद वाटायला पाहिजे. नुसतं लोकांनी वाहवा करून काय उपयोग! लोकांनी चांगलं म्हटलं की, आपलं गाणं चांगलं ही काही गाण्याची कसोटी नव्हे. टेस्ट नव्हे. स्वतःला समाधान वाटायला पाहिजे. कमीत कमी आपल्याला समाधान वाटायला पाहिजे. मग दुसऱ्यांचं बघू. त्याच्यासाठी आपण नंतर करू. पण अगोदर आपल्याला आनंद होतो का? नाही तर डोंबारी खेळ करतात आणि गाणारे गातात, यांत काही फरक नाही." "खरं आहे. बरंय मग, कुमारजी."

[पुणे आकाशवाणीच्या सौजन्याने]




## निवेदन : विजय परुळकर

## लेखक : अनिल हवालदार

There is lot of steel in the air of Vietnam, ही उक्ती अगदी सार्थ आहे. बंदुकीच्या गोळ्या, मशिनगनच्या गोळ्या, उखळी तोफांचे गोळे, विमानांतून पडणारे बाँब यांनी व्हिएटनामचा आसमंत सतत गजबजलेला आहे. दक्षिण व्हिएटनामचा बहुतांश भाग व्हिएटकाँगनी व्यापलेला असल्याने रस्त्यावरची सलग वाहतूक तिथं अवघड आणि धोक्याची होऊन बसली आहे. त्यामुळं सगळी मदार हवाईदलावर आहे. वाहतुकीसाठी आणि लष्करी सामग्री हलवण्यासाठी विमानांचा मोठ्या प्रमाणावर तर उपयोग होतोच ! शिवाय जमिनीवरच्या मोहिमांना मदत करण्याची अमेरिकेच्या हवाईदलाला कामगिरी करावी लागते. गेल्या फेब्रुवारीपासून अमेरिकेने व्हिएटनाममध्ये चढाईचा जोर वाढवला आहे. दिवसाला जवळ जवळ दोनशे ते तीनशे बाँबहल्ले केले जातात. सिंगल मशिनची 'स्कायरेडर' विमानं बाँबहल्ल्यासाठी प्रामुख्यानं वापरली जातात. ही विमानं इतर कुठल्याही विमानांपेक्षा जास्त बाँब वाहून नेऊ शकतात. आपल्या लक्ष्यावर जास्त वेळ स्थिर राहू

# व्हि ए ट ना म च्या



स्कायरेडची
बाँब फेक

# आ का शा त

शकतात. जमिनीवरच्या मोहिमांना ही ' स्कायरेडर ' विमानं पहिला हल्ला करून फार मदत करतात. त्यांना Work horses of American Airforce in Vietnam अशी सार्थ पदवी मिळाली आहे. उत्तर व्हिएटनामवर हल्ला करण्यासाठी ' फँटम ' किंवा ' थंडरचीफ ' या विमानांचा प्रामुख्यानं वापर केला जातो.

व्हिएटनामच्या भूमीवरच्या युद्ध-मोहिमांचं चित्रीकरण केल्यानंतर मला तिथल्या हवाई–मोहिमा चित्रीत करायच्या होत्या. व्हिएटनाममध्ये बाँबर विमानात बसण्यापूर्वी मी कंबोडियात एका बाँबर विमानातून चित्रीकरण करण्याचा अनुभव घेतला होता. कंबोडियाच्या नाँपेन (Pnonpenh) या राजधानीची मी त्या जुन्या बनावटीच्या बाँबर विमानातून काही दृश्यं घेतली होती. चित्रीकरण झाल्यावर त्या विमानाच्या फ्रेंच पायलटला कसरती करून दाखवण्याची हुक्की आली. त्याने विमान सर्रकन् खाली आणलं–वर नेलं–कोलांटचा उडचा घेतल्या ! माझी आतडी तुटायची वेळ आली. डोळे बाहेर येतायत असं वाटायला


लागलं ! कानाच्या शिरा तडतडल्या ! विमानतळावर उतरल्यावर मला एक पाऊल टाकता येईना ! पायांतून अक्षरशः गोळे आले. नंतर तीन दिवस मी अंथरूण धरलं होतं !

बाँबरच्या या पहिल्या भयानक अनुभवानंतरही माझी खुमखुमी जिरली नव्हती. मी व्हिएटनाममधल्या हवाईदलाच्या अधिकाऱ्यांना गाठलं ! 'स्कायरेडर'मधून विमानहल्ला चित्रीत करायचा ठरवलं ! मी एका 'स्कायरेडर्स'च्या ताफ्याबरोबर निघालो. बाँब टाकण्यासाठी विमानं खाली झेपावू लागली. मी बसलो होतो ते विमान आपल्या लक्ष्यावर हल्ला करायला खाली निघालं ! बापरे ! इतक्या प्रचंड वेगानं ते जमिनीच्या वर दोनशे फुटांवर आलं की माझा चेहरा अक्षरशः तांबडा-पिवळा झाला. पोटात भलामोठा खड्डा पडला. मी हात उचलून कॅमेऱ्याची कळ-सुद्धा दाबू शकलो नाही. पुन्हा एकदा झेप घेताना प्रयत्न केला ! डोळे खोबणीतून निसटून गेले असं वाटलं ! अंगातलं सगळं रक्त डोक्यात उसळून आल्यासारखं झालं ! नुसता हात उचलून कॅमेऱ्याची कळ दाबणं अशक्य ठरलं ! पुन्हा तीन दिवस अंथरूण धरावं लागलं ! 'स्कायरेडर'मधून चित्रीकरण करण्याचा नाद मला सोडावा लागला. दिवसाकाठी वीस-वीस उड्डाणं करणाऱ्या त्या वैमानिकाची धन्य आहे बाबा !

अखेर बाँबहल्ला चित्रीत करायला मी 'बर्ड डॉग' या टेहळ्या विमानाचा उपयोग केला. व्हिएटनामच्या युद्धात या 'बर्ड डॉग' विमानांचा नव्या पद्धतीनं वापर केला जात आहे. या विमानांचा ताशी वेग जेमतेम ९० ते ११० मैल असतो. जमिनीपासून ५०० ते १,००० फुटांवर ती उडत असतात. टेहळणीसाठी यांचा उपयोग केला जातो. ती निःशस्त्र असतात. जमिनीवरच्या हल्ल्याचा धोका टाळण्या-साठी ती कधीही सरळ रेषेत उडत नाहीत. पायलटशेजारी बसण्याच्या जागेच्या दोन्ही बाजूंना उघडया खिडक्या असल्यानं मी स्वतःला पट्ट्यांत घट्ट बांधून घेतलं होतंच ! पण कॅमेराही पट्ट्यानं बांधून घेतला होता. जरा इकडे तिकडे विमान झालं असतं तर आमची स्वारी सरळ घटोत्कचासारखी खाली पडली असती !

हल्ल्याच्या ठिकाणावर चकरा मारून 'बर्ड डॉग'चे वैमानिक बारीकसारीक तपशील गोळा करून आणतात. त्यांच्या अहवालावर आणि निरीक्षणावर हवाई-दलाच्या संपूर्ण हालचाली अवलंबून असतात. प्रत्यक्ष बाँबहल्ल्याच्या अगोदर हे 'बर्ड डॉग' हल्ल्याच्या जागेवर 'धुराचे बाँब' टाकून जातात आणि बाँबहल्ला करणाऱ्या विमानांना आपल्या निशाणाचा अचूक वेध घेता येतो. मी चित्रीकरण करीत अस-ताना माझ्या पायलटनं चार वेळा खाली जमिनीवरचे व्हिएटकाँग दाखवले. पण मला एकदाही काही दिसलं नाही ! त्यांची नजर सरावलेली होती !

अमेरिकन नौदलाच्या सातवा काफला सबंध दक्षिण चिनी समुद्रात संचार करतोय ! या काफल्यात सुमारे २४३ युद्धनौका आहेत. प्रत्येक विमानवाहू युद्ध-




'बर्ड डॉग' टेहळणीच्या तयारीत

नौकेबरोबर दोन किंवा तीन छोट्या विनाशिका असतात आणि प्रत्येक विमानाच्या उड्डाणाच्या वेळी व उतरायच्या वेळी एक हेलिकॉप्टर नौकेभोवती सतत घिरट्या घालीत असते. अपघात झाला तर तावडतोब मदत करता यावी हा उद्देश !

## सातव्या काफल्यावरील पहिला भारतीय

मला अमेरिकन नौदलाच्या सातव्या काफल्यावर जायला परवानगी मिळाली ! एका मध्यम आकाराच्या 'टायकॉन-रोगा' [Tycon Deroga] नावाच्या विमानवाहू नौकेवर मी जाणार होतो. सायगावला C-118 जातीच्या बॉंबरमध्ये बसलो आणि टायकॉन-रोगाची वाट धरली. बॉंबरमधून विमानवाहू नौकेवर उतरण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग ! जहाजाच्या डेकवर वेगात आलेले विमान एकदम थांबते ! त्यासाठी 'लॅंडिंग'च्या अगोदर सर्वांगाला गच्च पट्टे बांधून श्वास रोखून मी बसलो होतो. विमान खाली यायला लागलं ! आता कुठला अनुभव येणार या दडपणाखाली मी बसलो होतो. पण एकदम सीट मागे ओढल्याचा भास झाला आणि विमान थांबल्याचं मला समजलं ! विशेष काही झालं नाही अशा आनंदात मी विमानातून खाली उतरलो आणि एकदम धाडदिशी उताणा कोसळलो. आपण एका विमानवाहू जहाजावर उतरलोय हे माझ्या त्या वेळी लक्षात आलं ! जहाजाला वेग होता आणि अस्मादिक सायगावच्या विमानतळावर उतरल्याच्या थाटात उतरल्यानं सलामीला अशी 'टायकॉन-रोगा'नं मला आपटी दिली ! मला माझा तोल सावरून व्यवस्थित चालायला जवळजवळ पंधरा मिनिटं लागली.

'टायकॉन-रोगा'च्या नोंदबुकांत मी सही केली तेव्हा तिथला अधिकारी म्हणाला–"जगातल्या सगळ्या राष्ट्रांची माणसं आता या बोटीवर येऊन गेली म्हणायला हरकत नाही !" अमेरिकन नौदलाच्या सातव्या काफल्यावर जाणारा मी पहिलाच भारतीय होतो !

त्या विमानवाहू नौकेच्या रचनेची कल्पना देण्यासाठी प्रथम मला अधिकाऱ्यांनी

Slide Show दाखवला. मला ती पद्धत फार आवडली. या नौकेवर ११० विमानं वाहून न्यायची सोय होती. ' टायकॉन-रोगा 'च्या ' फ्लाईंग डेक 'वरून एका वेळी ३५ विमानं उड्डाण करू शकत होती. या नौकेवर तीन हजार लोक काम करीत होते. चोवीस तास बोटीवरची यंत्रणा कार्यमग्न होती आणि दर वीस मिनिटांना विमानाचा जथा हल्ल्यासाठी उडत होता. प्रत्येक उड्डाणाच्या वेळी एक हेलिकॉप्टर नौकेभोवती उडत होते. मी हेलिकॉप्टरमधून प्रथम ' टायकॉन-रोगा 'चे काही ' शॉटस् ' घेतले. प्रत्येक वमानिक उड्डाणाच्या वेळी अतिशय गंभीर दिसत होता. त्यांच्या चेहऱ्यावर जबरदस्त दडपण आल्यासारखं वाटायचं ! त्याला कारणही तसेच आहे. डेकवरून Catapult च्या साहाय्यानं विमानाला गती दिली जाते. त्या धक्क्यानंतर ' स्टिक ' ओढून विमानाची इंजिनं सुरू करणं हे अतिशय तापाचं काम आहे.

' टायकॉन-रोगा 'वरच्या विमानोड्डाणाचा आणि विमान उतरवण्याचा संपूर्ण कार्यक्रम मी चित्रीत केला. जहाजांचा वेग ताशी ४० नॉट होता. समुद्रावर तुफान वारं असल्यानं चित्रीकरण करताना कमालीचा त्रास झाला. जवळजवळ पाच तास मी सतत काम करीत होतो. चित्रण आटोपून संध्याकाळी सायगावला परत आलो !

विमानहल्ल्यासाठी अमेरिकन हवाईदल सायगावच्या विमानतळाचा आणि आरमाराच्या सातव्या काफल्यातल्या विमानवाहू नौकांचा उपयोग करते, त्याप्रमाणं व्हिएटनामपासून दोन हजार मैलांवरच्या एका बेटावरच्या तळाचाही वापर करते. या तळाचं नाव ग्वाम [ Guam ]. या तळावरून B-52 जातीची अजस्र बाँबर विमानं उत्तर व्हिएटनामवरच्या हवाई हल्ल्यासाठी वापरली जातात. आठ इंजिनांचे हे B-52 बाँबर विमान एका वेळी ११० बाँब वाहून नेऊ शकते. त्याच्या पंखावर रडारची सोयही आहे. तीस हजार फूट उंचीवरून या विमानातून बाँब टाकले तरी हल्ला प्रभावी आणि परिणामकारक होऊ शकतो. एरवीच्या विमानांना बाँबहल्ल्यासाठी तीनशे फुटांपर्यंत खाली यावं लागतं ! या B-52 बाँबर विमानांचा व्हिएटकाँगनी आणि उत्तर व्हिएटनामी सैनिकांनी धसका घेतला आहे. या विमानांना हवेतल्या हवेत इंधन घेण्याची सोय आहे. या विमानांच्या एका हल्ल्यासाठी अमेरिकेचे दहा लाख डॉलर्स खर्च होतात आणि व्हिएटनाममध्ये दिवसाला किमान पंचवीस तरी B-52 विमानांचे हल्ले केले जातात !

अमेरिकन हवाईदलाची अशी सुसज्ज यंत्रणा व्हिएटनामच्या आकाशात वावरते आहे. व्हिएटनामच्या कुठल्याही भागात सूचना मिळाल्यापासून अवघ्या दहा मिनिटांत हवाई मार्गानं मदत पोचवण्याची व्यवस्था आहे. अवघ्या दहा मिनिटांच्या या मदतीमुळं वैमानिकांचं धैर्य वाढलं आहे. त्यांचं जीवन अधिक सुरक्षित बनलं आहे. एखादा वैमानिक खाली पडला तर त्याचे सोबती त्याच्याभोवती घिरट्या घालून त्याला संरक्षण देतात. आसपास सारखा गोळीबार करत राहतात. तोपर्यंत हेलिकॉप्टर येऊन वैमानिकाला उचलून घेऊन जाते. दहांमधले नऊ संकटग्रस्त

वैमानिक वाचवले जातातच ! त्यामुळं आतापर्यंत उत्तर व्हिएटनाममध्ये अमेरिकेचे फक्त अकरा वैमानिक पकडले गेले आहेत !

परंतु एवढी काळजी घेऊनही काहीतरी विपरीत घडतंच ! अशाऊ कँपवरचा व्हिएटकाँगचा हल्ला ही एक व्हिएटनामच्या युद्ध-इतिहासातली दुर्दैवी घटना ! अमेरिकेच्या या अशाऊ कँपवर एका पहाटे व्हिएटकाँग सैनिकांनी मोठ्या संख्येने हल्ला चढवला. जवळजवळ तीन-चतुर्थांश कँप त्यांनी मारून काढला ! दीड दिवस भयंकर लढाई झाली ! पण अमेरिकन वैमानिकांना त्या दीड दिवसात अजिबात मदत करता आली नाही. निसर्गानं त्यांच्याशी असहकार पुकारला होता. मुसळधार पाऊस कोसळत होता. ढगांनी आकाश व्यापून गेलं होतं ! वैमानिकांना जमीन दिसणं अवघड होऊन बसलं ! या अशाऊ कँपवरच्या फक्त सोळा लोकांना अमेरिकन वैमानिक तिसऱ्या दिवशी वाचवू शकले !

## एका व्हिएटकाँगची किंमत !

"व्हिएटनामच्या युद्धात अमेरिकेनं प्रत्यक्ष भाग घेतला तर अमेरिकेला हे युद्ध जिंकलंच पाहिजे," असे उद्‌गार ज्या वेळी फ्रेंचांनी अमेरिकेची व्हिएटनाममध्ये मदत मागितली होती, तेव्हा श्री. डलेस यांनी काढले होते. गेल्या फेब्रुवारीपासून अमेरिकन सेना व्हिएटनामच्या भूमीवर प्रत्यक्ष लढते आहे. प्रचंड प्रमाणावर युद्ध-सामग्री आणली जात आहे. व्हिएटकाँगच्या गनिमी युद्धाला तोंड देणं अमेरिकन सैनिकांना जड जातंय ! तरीही त्यांचं पाऊल हळूहळू पुढं पडतंय ! सरासरी काढली तर एक व्हिएटकाँग मारायला अमेरिकेला जवळजवळ पंधरा लाख डॉलर्स खर्च करावे लागत आहेत. साडेतीन लाख अमेरिकन सैनिक आज व्हिएटनामच्या भूमीवर लढत आहेत. 'ओपन आर्म्स ॲक्शन 'सारख्या मोहिमा ते अंमलात आणत आहेत. विमानातून ते प्रचारपत्रकं टाकतात. जो व्हिएटनामी पुरुष [ किंवा स्त्री ] ते पत्रक जवळच्या सरकारी ठाण्यावर नेऊन देईल त्याला निर्वासित मानून सर्व प्रकारची मदत करण्यात येते. काही व्हिएटकाँग सैन्यातले अधिकारीही अशा मदती-साठी आल्याची उदाहरणं घडली आहेत.

गेल्या सहा महिन्यांत व्हिएटकाँगनी फार मार खाल्लाय ! पावसाळा हा त्यांच्या उठावाचा खरा मोसम ! पण यंदा पावसाळ्यातही त्यांचा फारसा जोर नव्हता. जिंकलेल्या भूमीचा ताबा घेऊन संरक्षणव्यवस्था करायला अमेरिकेजवळची सेना कमी पडते आहे. ती उणीव भरून निघाली तर ह्या युद्धाचा रणभूमीवरचा निर्णय लवकर लागेल ! त्यासाठी अमेरिकेला बेसुमार पैसा ओतावा लागतोय ! माणसं गमवावी लागताहेत ! पण प्रतिष्ठेसाठी एवढी किंमत द्यायची त्यांची तयारी आहे !

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ बूर्ज्वा दाढी

कुठल्याही साधारण समाजात मास्तर विद्यार्थ्याला शिकवतो. पण लाल चीन-सारख्या असाधारण समाजात विद्यार्थी मास्तरला शिकवतो. पेकिंग विश्वविद्यालयाचे कुलगुरू लू पिंग यांच्या पतनाने चीनच्या सांस्कृतिक (सं) क्रांतीला सुरुवात झाली. त्यांचेच उदाहरण घ्या. या गृहस्थाने विज्ञान शिकविण्यावर भर दिला, हा त्याच्या-वर मुख्य आरोप होता. बरोबर आहे ! जोपर्यंत पृथ्वीचे परिभ्रमण माओच्या विचाराने होत आहे असे सप्रमाण सिद्ध झालेले नाही, किंवा जोंपर्यंत हायड्रोजन व ऑक्सिजन या दोघांपैकी एकहीजण माओचा हुकूम नसताना पाणी तयार करण्याचा अव्यापारेपू व्यापार करतो हे उघड उघड दिसते तोपर्यंत विज्ञान हे माओविरोधी आहे व विज्ञानाच्या अज्ञानातच साम्यवादी आनंद आहे; पण लू पिंग जेव्हा नत-द्रष्टपणे विद्यार्थ्यांचा हा आनंद हिरावून घेऊ लागला, तेव्हा विद्यार्थ्यांनीच त्याला चांगला धडा शिकवला आणि या गृहस्थाला व त्याच्या हाताखालच्या अठरा प्राध्या-पकांपैकी सोळा प्राध्यापकांना ' माओचा विचार ' नीट शिकण्यासाठी खडी फोडा-यला पाठविण्यात आले.

आता खडी फोडून एखादे तत्त्वज्ञान नीट कसे शिकता येईल, असा बावळटपणाचा प्रश्न चीनमध्ये कोणी विचारीत नाही. ' माओचा विचार ' नामक तत्त्वज्ञान अतर्क्य म्हणजे तर्कशक्तीच्या किंवा बुद्धीच्या पलीकडे आहे, म्हणजे ते मेंदूने नव्हे तर फक्त हातापायांनीच शिकता येते. दुसरे म्हणजे ज्याप्रमाणे एका म्यानात दोन तरवारी राहू शकत नाहीत त्याप्रमाणे चिनी डोक्यात माओचा विचार व स्वत:चा विचार हे एकाच वेळी राहू शकत नाहीत. तेव्हा आधीच्या विचारांची अडगळ पडलेल्या डोक्यातून माओ-विचार आत घुसविण्यापेक्षा तो हाता-पायांतून आत शिरकावणे अधिक योग्य असावे, इष्ट असावे अन् उचीतही असावे.

शिवाय लू पिंग हा माणूस ' बोले तैसा चाले त्याची निंदावी पाउले ' अशापैकी

होता; म्हणजे त्याच्या घराची झडती घण्यात आली तेव्हा तेथे बूर्ज्वा चैनीच्या वस्तू सापडल्या. त्यांत सर्वांत भयंकर म्हणजे दाढीचे सामान व शर्टाची बटणे या वस्तू-देखील सापडल्याचा मुद्दाम उल्लेख करण्यात आला आहे. बापरे, काय हा चनी माणूस ! समस्त चीनमध्ये खुद्द माओच्या हस्ते हवी त्याची बिनपाण्याची होण्याची सोय असताना एखाद्याने स्वत:चे दाढीचे सामान बाळगायचे म्हणजे काय ? शिवाय अर्जुनाच्या रोमारोमांत कृष्ण भरला होता त्याप्रमाणे चिनी रोमारोमांत माओ भिनायचा असेल तर आधी रोम तर हवेत ! अन् दाढी केल्यावर ते कोठून राहणार ? म्हणजे दाढी करणे हे एक नितांत माओविरोधी कृष्णकृत्य आहे, यात शंका नाही.

आता शर्टाची बटण लावण्याने कोठली मध्यमवर्गीय चैन होते हे माझ्यासारख्या मध्यमवर्गीय चैनी माणसाला समजणे जरा अवघड आहे. पण माओच्या बंद गळ्याच्या कोटाची बटणे नेहमी बंद असल्याने त्याला शर्टाची बटणे लावावीच लागत नसतील व जे माओ (देखील) करीत नाही ते सामान्य चिनी माणसाने करायचे म्हणजे ती अर्थातच चैन झाली, नाही का ?

## ☐ काव्य आणि इन्कमटॅक्स

काव्याचे उपयोग काय ? तसे पाहिले तर बरेच आहेत. पहिला मोठा उपयोग म्हणजे मासिकांत लेखाच्या खाली उरलेली जागा भरून काढणे, दुसरा उपयोग म्हणजे "आमचे हे कविता करतात होऽऽऽ" अशी प्रौढी मिरवता येणे. तिसरा म्हणजे गणेशोत्सवाच्या सेक्रेटरीची काळजी दूर करणे—दुसरे काहीच सुचले किंवा जमले नाही की तो काव्यगायनाचा किंवा निदान काव्यवाचनाचा कार्यक्रम ठेवून मोकळा होऊ शकतो. चौथा म्हणजे अर्थहीन, असंबद्ध लिखाणही छापून येऊ शकते हे सिद्ध करणे; पण याहूनही नवीन असा एक उपयोग नुकताच वाचनात आला. इंग्लंडात म्हणे एका माणसाला इन्कमटॅक्स रिबेटचे पैसे मिळायचे होते, पण काही केल्या त्याची दाद लागत नव्हती. अखेर त्याने इन्कमटॅक्स ऑफिसरला उद्देशून एक करुण कविता केली व तिच्यात रिबेटची मागणी केली.—आणि लगेच रिबेटचे पैसे मिळाले. आता बोला ! कवितेचा हा उपयोग आपल्या कवींच्या कधी लक्षात आला होता ? आता एवढे खरे की आपल्याकडच्या कवींचा अन् इन्कमटॅक्सवाल्यांचा फारसा कधी संबंधच येत नाही. तरीदेखील कवितेवर पैसे मिळतात ही कल्पनाच किती काव्यमय आहे ! आता प्रत्येक शेटजी आपल्या पदरी कारकुनाच्या ऐवजी कवी बाळगेल, अन् प्रत्येक इन्कमटॅक्स ऑफिसरला येणाऱ्या प्रत्येक पत्राचा मायना "प्रियकरा—" असा असेल.

# उर्दू वार्ता

संकलन : हिदायतखान

## ☐ अलीगढ विद्यापीठ

'शबिस्तान' मासिकाला दिलेल्या खास मुलाखतीत माजी केंद्रीय शिक्षण मंत्री फकरूद्दिन अली अहमद यांनी पुढील उद्‌गार काढले आहेत–

"भूतकाळात या विद्यापीठाची ज्या तत्त्वांसाठी स्थापना झाली होती, तिच्यात मुळीच बदल करू नयेत ! परंतु याचा अर्थ असा नव्हे की, तेथे मुस्लिमेतरांना मज्जाव असावा ! सर्व धर्म व जातीच्या शैक्षणिक उद्धाराचे ते एक मुक्तद्वार असावे. आणि माझ्या माहितीप्रमाणे सध्यादेखील तेथे सर्व जाती-जमातींचे विद्यार्थी व अध्यापक आहेत. सर्वांना सारख्याच सवलती उपलब्ध आहेत."

उर्दूच्या भवितव्याविषयी विचारता ते म्हणाले, "उर्दूच्या पुरस्कर्त्यांवरच या भाषेचे भवितव्य अवलंबून आहे. माझ्यापरीनं मी प्रस्तुत भाषेच्या विकसनासाठी प्रयत्न केलेले आहेत. माझ्या मते मुलांना त्यांच्या मातृभाषेतूनच प्राथमिक शिक्षण मिळावयास हवे आणि म्हणूनच मी बिहार, यू. पी. व दिल्ली येथील राज्य सरकारांशी याबाबत विचारविनिमय करून त्या दृष्टीने प्रत्यक्ष कृतीही केलेली आहे. बिहारमध्ये उर्दूला कायदेशीर मान्यता देण्यात आली असून उर्वरित दोन्ही राज्यांतही ही योजना विचाराधीन आहे."

'शबिस्तान' (उर्दू डायजेस्ट) दिल्ली, मार्च ६७.

## ☐ पाक आणि इस्लाम

मध्यंतरी साजऱ्या झालेल्या रमझान ईदच्या तिथीबाबत पाकिस्तानात प्रे. अयूब-खान व मौलवी यांच्यांत बरेच वादंग माजले व शेवटी त्याची परिणती मौलवींना स्थानबद्ध करण्यात झाली !

प्रे. अयूबखान यांची धार्मिक बाबतीत चाललेली ही ढवळाढवळ सर्वसामान्य जनतेतही असंतोष पसरवू लागली आहे.

मध्यंतरी मुल्ला-मौलवींना 'प्लीज' करण्यासाठी प्रे. अयूब यांनी शाळा-कॉलेजां-तून गीत-नृत्यादी कार्यक्रमांवर कायदेशीर बंधने घातली होती. आणि आता त्यांच्या-शीच ते अगदी हमरीतुमरीवर आले आहेत.

तें काहीही जरी असले तरी हिंदुस्थानातील वा इतर परदेशांतील मुस्लिम व इस्लामची सदासर्वदा फाजील काळजी वाहणाऱ्या व आपले राष्ट्र इस्लामी राष्ट्र असल्याच्या वल्गना करणाऱ्या 'या दिव्याखाली' असा अंधार आहे ! ●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**

**सायनाचार्य, नासिक**

**२५ ते ३१ मार्च १९६७**

**मेष :–** साडेसाती सुरू आहे. मंगळ प्रतिकूल आहे. गुरुही तुमच्यावर काहीसा नाराजच आहे. हे सारे कबूल ! पण निष्कलंक चारित्र्य आणि ज्वलंत निष्ठा एवढ्या सामर्थ्यानिशी तुम्ही कार्यक्षेत्रात उतरलात–तर ग्रहही तुमच्या प्रगतीच्या आड यायला निश्चित डरतील. निर्धार-निष्ठेचे व्रत आचरणारांना कळिकाळाचेही भय नाही.

या वेळी आपणांस खूपच परिश्रम करावे लागतील. अनेकांचे सहकार्य घ्यावे लागेल. पैशाअडक्याच्या समस्या सोडविण्यासाठी अविश्रांत झटावे लागेल. पण शेवटी यश मिळेल. अगदी घवघवीत.

दि. २८ ते ३१ या काळी अपेक्षित यश मिळावे.

**वृषभ :** षष्ठस्थानी वक्रीमंगळ हा काही फारसा चांगला योग नव्हे; पण या अनिष्टतेची आपणांस दखल घ्यायची गरजही भासणार नाही. सूर्य-शनी एकादशात आणि त्याचा गुरूशी शुभयोग एवढ्या सामग्रीनेही आपण कोणताही अवघड गड जिंकू शकाल. या वेळी परिश्रम फार करावे लागतील. थकल्याभागल्यासारखे जाणवेल. पण याच वेळी असे काही अनन्यसाधारण यश आपण मिळवाल की, जगाने तुमचा हेवा करावा.

या आठवड्याच्या अखेरीस परि-

स्थितीला एकदम कलाटणी मिळेल. नवे क्षेत्र हाती गवसेल. आणि त्या क्षेत्रात तुमच्या यशोदुंदुभी निनादू लागतील. भंगलेल्या अपेक्षा बेमालूमपणे सांधल्या जातील.

दि. २७ ते ३० या कालाची नोंद करा.

**मिथुन :** पाचवा मंगळ वैचारिक संघर्ष निर्माण करतो तर दहावा शनी कार्यक्षेत्र दूषित बनवतो. यामुळे सध्याचे दिवस फारसे स्वास्थ्याचे जाणवतील असे वाटत नाही. या पेचप्रसंगामधून कर्केच्या गुरूच्या साहाय्याने तुम्ही मार्ग काढू शकालच; पण त्या गोष्टी झटपट होण्यासारख्या नाहीत.

व्यवसायधंदा आणि पैसाअडका या बाबतींत निराशेचा प्रसंग सहसा निर्माण होणार नाहीच. पण वाढत्या अवास्तव खर्चाला आळा घालण्याचा प्रयत्न केलात तरच !

थोरांशी खटकू लागेल, वरिष्ठांशी बेबनाव माजू लागेल. काहीसे जुळते-मिळते घेऊन वागलात तरच संभाव्य अनवस्था प्रसंग टळू शकेल. दूरच्या प्रवासाचे टाळा. मंगलकार्याचे पुढे ढकला.

दि. २७ ते २९ अनुकूल काल.

**कर्क :** ८ मार्च ते २६ मे या कालखंडात वक्री मंगळाचा धिंगाणा सुरू आहे. हा काळ एकंदरीत ठीक नाही असे आपणांस मला स्पष्टपणे सुचविणे भाग आहे.

अशा वेळी एकच एक भरंवशाचा गडी तुमच्या पाठीशी उभा आहे तो म्हणजे गुरू. त्याचे मार्गदर्शन आणि साहाय्य या वेळी तुम्हांला लाख मोलाचे ठरावे.

या आगामी महिनाभराच्या कालात स्थानांतर करू नका. इष्टमित्रांच्या भरंवशावर फारसे राहू नका. नोकरचाकरही निष्ठेने तुमच्याशी वागतील ही आशा करू नका.

जातीने अवधानपूर्वक सर्व कामे केलीत तरच हा काळ निभावला जाईल. सांपत्तिक ओढाताण तर कमालीची जाणवेल. अनारोग्य पाठीशी लागेल.

दि. २५–२६–३० थोडेफार यश याच काळी लाभेल.

**सिंह :** दि. २३ च्या रवि-शनी युतिपासून तुमचे वातावरण काहीसे बिघडलेले असावे. हाही आठवडा अपेक्षेप्रमाणे स्वास्थ्याचा जाणवेल, अशी आशा करणे खोटे.

एकट्या मंगळाच्या पाठिंब्यावर फारमोठे यश मिळविणे कठीणच. साध्या गोष्टींसाठीही प्रयत्नांची शिकस्त करावी लागेल; प्रवास-धावपळ करून अपेक्षित कार्ये पूर्णत्वाने होतीलच याची शाश्वती नाही. अगदी भरंवशाची माणसेही ऐनवेळी दगा देतील. राजकीय क्षेत्रांत मात्र तुमचे महत्त्व खूपच वाढीस लागेल. जबाबदाऱ्या वाढू लागतील. मोठे गुंतागुंतीचे प्रश्न चातुर्याने सोडवावे लागतील.

दि. २७ ते २९ अनेक समस्या सुटाव्यात.

**कन्या :** या वेळचे ग्रहमान तसे वाईट नाही. पण खात्रीने एखादी गोष्ट करीन असे म्हणणे म्हणजे ' वदतो व्याघात ' ठरेल. धनस्थानी वक्रीमंगळाचे संचलन चालू

झालेले असल्यामुळे, खूप पैसा हाती येऊनही टंचाई तीव्रतेने जाणवतच राहील. काही वेळी उधार-उसनवारीची नामुष्की पत्करावी लागेल. अकरावा गुरू प्रतिष्ठेला धक्का ल.गू देणार नाही एवढेच करील.

या आठवड्यात नवे कार्यक्रम हाती घेण्यात येतील. सामाजिक क्षेत्रातील विशेष प्रतिष्ठेचे स्थान भूषविण्याची संधी लाभेल. नोकरीधंद्यात या वेळी प्रत्यक्ष लाभ जरी पदरी पडू शकला नाही, तरी लवकरच फार मोठ्या लाभाचे आपण धनी होऊ अशी खात्री वाटू लागेल.

दि. २८ ते ३० विशेष यश, लाभ देणारा काळ.

**तूळ :** सभोवतालचे वातावरण जेव्हा प्रतिकूल बनू लागते, क्षणोक्षणी पेचप्रसंग वाढू लागतात, तेव्हाच तुमच्यातील ज्वलंत कर्तृत्व उफाळून येते. हा काळ असाच आहे. मंगळाने तुम्हांला आव्हान दिले आहे. आजवर माघार घेऊन पाहिली. आता आगेकूच करण्याशिवाय गत्यंतर नाही, अशी तुमची खात्री होऊन चुकल्यामुळे निर्धाराचे खड्ग निरुपायाने हाती धरावी लागले. या अटीतटीच्या सामन्यात शेवटी यश तुमचेच.

कामाचा ताण खूपच वाढू लागेल. समाधानाची झोपही येईनाशी झाली आहे. विरोधक उठाव घेतील की काय, अशी भीती वाटू लागलेली आहे. पण माझी खात्री आहे की या सर्व पेचप्रसंगामधून आपण यशस्वीपणे पार पडाल.

दि. २९ ते ३१ प्रयत्नाला यश येईल.

**वृश्चिक :** गुरु-शनीसारख्या विशाल तेजोगोलांची अनुकूलता लाभलेली असूनही एकटा मंगळही माणसाला कसा बेजार करतो, याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे सध्याची मेषराशी व्यक्ती.

तुमचे यश, तुमची प्रतिष्ठा न पाहवल्यामुळे हितशत्रू तुमच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्याचा प्रयत्न करू लागतील. अगदी भरंवशाची माणसेही ऐनवेळी दगा देतील. वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविणे अशक्य होईल. नको ती माणसे या वेळी समोरच टपकतील. प्रत्यक्षात जरी काही भयंकर प्रसंग उद्भवला नाही तरी काही दिवस मानसिक चिंता, व्यथा सहन करावी लागेलच. पैसा गेला तरी चालेल, पण प्रतिष्ठेला धक्का लागू नये, यासाठी सतत जपायला हवे.

दि. २५ ते २७ या वेळी अनेकांचे साहाय्य लाभेल.

**धनू :** या वेळी आपणांस कोणतीच बाजू फारशी समाधानाची दिसणार नाही. पैसा-प्रकृती-प्रतिष्ठा या सर्वांवरही थोड्याफार प्रमाणात सतत हल्ले होऊ लागलेले आहेत. निर्धाराने प्रतिकार करण्याशिवाय गत्यंतर नाही. इष्टमित्र, हितचिंतकांची सहानुभूती गमावून बसण्याचा प्रसंग ओढवेल, आवक आणि व्यय यांचे व्यस्त प्रमाण असल्यामुळे प्रतिष्ठा तर धोक्यात येणार नाही ना, अशी भीती वाटू लागेल.

सध्याचे ८-१५ दिवसच काहीसे जपून काढा. त्यानंतरच या पेचप्रसंगामधून सुटण्याचे मार्ग दिसू लागतील. हरवलेले स्वास्थ्य गवसेल, नवे क्रांतीचे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील.

दि. २७ ते २९ काही लाभाच्या घटना या काळी घडाव्यात.

**मकर :** सध्या तुमच्यावर साऱ्या ग्रहांची मेहेरनजर दिसते. हाती घेतलेली सारी कामे अपेक्षेबाहेर यशस्वी ठरतील; पण कामकाजाच्या धावपळीत आणि व्यवसायधंद्याच्या गडबडीत प्रकृतीकडे दुर्लक्ष होऊ देऊ नका स्वत:च्या आणि कुटुंबियांच्याही.

मानमान्यता-प्रतिष्ठा आणि अधिकारग्रहण या दृष्टीने हा आठवडा फारच चांगला आहे, पण अंतर्मनात विचार–विकारांचे तुफान माजेल, चित्तवृत्ती अप्रसन्न बनेल.

स्थावराचा चिघळलेला प्रश्न निकालात निघेल, वाहनांची विवंचना मिटेल, पण पैशाअडक्याचा प्रश्न मात्र अपेक्षेप्रमाणे सुटणे कठीण !

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, मंगलकार्याचे निश्चित केले जाईल.

दि. २९ ते ३१ हा काल घवघवीत यश देणारा जाणवेल.

**कुंभ :** शनि-मंगळ धनस्थानी-मुखस्थानी आल्यापासून सांपत्तिक ताण खूपच वाढू लागलाय. त्यातून दंत, नेत्र विकारांची भर. एवढ्या अंतर्गत व वैयक्तिक बाबी सोडून दिल्यावर या कालासारखा यशस्वी काल क्वचित अनुभवलेला असेल.

विरोधकांची तोंडे बंद कराल, शत्रूंना ठोकरून काढाल. या वेळी कुठेही जा काहीही करा, निर्विवाद यश मिळेल. या वेळी आपणांस फार मोठे मानाचे पद मिळेल. पण " अत्युच्ची पदि थोरहि बिघडतो याची सतत जाणीव ठेवून वागलात तर भविष्यकाळात मानभंगाचे प्रसंग उद्‌भवणार नाहीत. विरोधकांशीही जुळते मिळते घेण्याची प्रवृत्ती सतत ठेवा. दि. २८ ते ३० या कालात प्रवास वरचेवर घडेल.

**मीन :** सूर्य-शनीचे तुमच्या राशीतूनच भ्रमण सुरू आहे. ते वैचारिक वादळ उठवतील. प्रकृती बिघडवतील. समाधानाची झोप येऊ देणार नाहीत.

साडेसातीतील उग्र कालखंडातून आपण जात आहात. उद्योगधंदा घसरणीला लागल्यासारखे वाटू लागेल. स्वास्थ्यच हरवल्याची पदोपदी जाणीव व्हायला लागेल.

आगामी १५-२० दिवस थोडेसे जपून काढलेत की, ही अनिष्टता ओसरल्याची जाणीव व्हायला लागेल. या वेळी प्राप्ती घटेल आणि खर्च मात्र सहस्रपटीने वाढू लागेल.

दि. २७ ते २९ थोडेफार समाधानाचे दिवस

●

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या

प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती

राजहंस प्रकाशन,

४१९ नारायण पेठ, पुणे २.




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**